। धाराशिव । वर्ष २५ वे । अंक २६९ वा । शुक्रवार, दिनांक ०९ जानेवारी २०२६ । पृष्ठे ६ । किंमत ०१ ₹ RNI MAHMAR/2003/11649

# लातूर समाचार

Email-dainiklatursamachar@gmail.com

प्रकाशन: धाराशिव (उस्मानाबाद आवृत्ती)
पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26

संस्थापक : स्व. शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक)

## भारतीय संस्कृतीचा वारसा जपत युवकांनी भारताला विकसित राष्ट्र बनविण्याच्या संकल्पनेत योगदान द्यावे –राज्यपाल आचार्य देवव्रत

**मुंबई/प्रतिनिधी** : भारताला २०४७ पर्यंत विकसित राष्ट्र बनविण्याच्या संकल्पनेत युवकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची व मोलाची आहे. देशाच्या सर्वांगीण प्रगतीसाठी युवकांनी विचार, कृती आणि नव कल्पनांच्या माध्यमातून पुढे येऊन भारतीय संस्कृतीचा वारसा जपत भारताला विकसित राष्ट्र बनविण्याच्या संकल्पनेत योगदान द्यावे, असे आवाहन राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी केले.

राष्ट्रीय युवा महोत्सव–विकसित भारत यंग लीडर्स डायलॉग २०२५–२६ राष्ट्रीय स्पर्धे साठी राज्यातून निवड झालेल्या युवकांशी राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी दूरदृश्य प्रणालीद्वारे संवाद साधला.

सह्याद्री अतिथीगृह येथे झालेल्या या कार्यक्रमास क्रीडा विभागाचे प्रधान सचिव संजय खंदारे,

राज्यपालांचे सचिव डॉ. प्रशांत नारनवरे, राज्यपालांचे सह सचिव एस. राममूर्ती, क्रीडा विभागाचे उपसचिव सुनील पांढरे, सहाय्यक संचालक मिलिंद दीक्षित, मुंबई विभागाच्या क्रीडा उपसंचालक सुवर्णा बारटक्के व राष्ट्रीय युवा महोत्सवासाठी निवड झालेले विद्यार्थी उपस्थित होते.

राष्ट्रीय युवा महोत्सवामध्ये सहभाग हा राज्यातील युवकांसाठी गौरवाची व प्रेरणादायी बाब असल्याचे गौरवोद्गार काढून दिल्ली येथील संवाद कार्यक्रमासाठी निवड झालेल्या युवकांना राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी शुभेच्छा दिल्या. राज्यपाल आचार्य देवव्रत युवकांशी संवाद साधताना म्हणाले, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून हा उपक्रम राबविण्यात येत आहे. स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीनिमित्त दरवर्षी होणाऱ्या राष्ट्रीय युवा महोत्सवाला नवे स्वरूप देण्यात आले असून देशातील सर्व राज्यातून विद्यार्थ्यांसाठी स्पर्धात्मक परीक्षा घेण्यात आली. त्यातून निवड झालेल्या तीन हजार गुणवंत युवकांना थेट पंतप्रधानांशी संवाद साधण्याची संधी या महोत्सवाच्या माध्यमातून मिळणार आहे. मेहनत, परिश्रम व गुणवत्तेच्या बळावर या



स्पर्धेसाठी निवड झालेल्या युवकांचे राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी कौतुक केले. ते म्हणाले, या स्पर्धेसाठी झालेली युवकांची निवड ही विकसित राष्ट्र निर्माणातील त्यांच्या कष्टाच्या भूमिकेची पावती आहे.

भारत हा युवकांचा देश आहे. युवक देशाच्या विकासाला अधिक गती देण्याची भूमिका बजावू शकतात, असा विश्वास व्यक्त करून राज्यपाल आचार्य देवव्रत म्हणाले, भारताचा विकास फक्त आर्थिक किंवा भौतिक उन्नतीपुरता मर्यादित नसून, संस्कृती, सभ्यता, परंपरा व नैतिक मूल्यांचे जतन हेही तितकेच महत्त्वाचे असल्याचे अधोरेखित करतो. संपूर्ण विश्व हे एक कुटुंब मानणारी विचारधारा ही भारताची ओळख असून भारताने संत–महात्म्यांच्या माध्यमातून मानवतेचा संदेश जगभर पोहोचविला असल्याचेही राज्यपाल आचार्य देवव्रत यावेळी म्हणाले.

राज्यपाल आचार्य देवव्रत म्हणाले, देश सर्व क्षेत्रात प्रगती करीत असून स्टार्टअप्स, आत्मनिर्भर भारत अभियानामुळे भारत जागतिक पातळीवर वेगाने प्रगती करत आहे. भारत आज जगातील चौथी मोठी अर्थव्यवस्था बनला असून, तिसऱ्या क्रमांकाकडे वाटचाल करीत आहे. विकासाचा लाभ समाजाच्या तळागाळापर्यंत पोहोचत आहे. युवकांमध्ये देशाला आत्मनिर्भर, समृद्ध आणि शक्तिशाली बनविण्याची क्षमता असल्याचे सांगून राज्यपाल आचार्य देवव्रत म्हणाले युवकांनी अपयश आल्यास खचून न जाता परिश्रम, चिकाटी आणि सकारात्मक विचार करून विकसित राष्ट्र निर्माणात आपले योगदान द्यावे.

या संवाद कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी विचारलेल्या प्रश्नांवरही राज्यपालांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या शेवटी निवड झालेल्या युवकांना प्रातिनिधिक स्वरूपात मान्यवरांच्या हस्ते किटचे वाटप करण्यात आले.

२०२५–२६ या वर्षातील राष्ट्रीय युवा महोत्सवाचे दिल्ली येथे ९ जानेवारी २०२६ पासून आयोजन करण्यात आले आहे. राष्ट्रीय युवा महोत्सव–विकसित भारत यंग लीडर्स डायलॉग या अंतर्गत ऑन लाईन स्पर्धा प्रथम टप्पा विकसित भारत क्विज, व्दितीय टप्पा निबंध लेखन स्पर्धा, तृतीय टप्पा –विकसित भारत पीपीटी चॅलेंज अशी स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेतून राज्यामधून ४५ युवांची निवड करण्यात आलेली आहे. तसेच जिल्हा, विभाग व राज्यस्तरीय युवा महोत्सव अंतर्गत सांस्कृतिक विभागातून २८ कलाकारांची आणि डिझाईन फॉर भारत आणि हॅक फॉर सोशल कॉज या स्पर्धेतून ५ स्पर्धकांची निवड करण्यात आली आली आहे. राज्यातून निवड झालेल्या युवक व त्यांच्यासोबत असलेल्या अधिकारी वर्गासह ८५ जणांचा चमू दिल्ली येथे राष्ट्रीय स्पर्धेसाठी आज मुंबई येथून रवाना झाला.

## क्राईम न्युज

### लोखंडी पोलची चोरी

ढोकी (प्रतिनिधी)– पोलीस ठाणे अंतर्गतफिर्यादी गंगाधर साहेबराव कोल्हे, वय ४३ वर्षे, रा.हावरगाव ता. कळंब जि. धाराशिव यांचे कसबा तडवळा शिवारातील २२ लोखंडी पोल एकुण १,५४,००० किंमतीचे दि.०२.१२.२०२५ रोजी १०.०० ते दि.२०.१२.२०२५ रोजी १४.०० वा. सु. अज्ञात व्यक्तीने चोरुन नेले. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे–गंगाधर कोल्हे यांनी दि.०७.०१.२०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन ढोकी पो ठाणे येथे भा.न्या. सं.कलम ३०३(२) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

### गंभीर जखमी होवुन मृत्यू

नळदुर्ग (प्रतिनिधी)– पोलीस ठाणे अंतर्गत मयत नामे–शिवकिरण अशोक शिरगुरे, वय ३१ वर्षे, रा. हंगरगा नळ ता. तुळजापूर जि. धाराशिव हे दि.०३.०१.२०२६ रोजी पिकअप मधून जात होते. दरम्यान इटकळ शिवारात एनएच ५२ रोडवर तुळजापूर नाका येथे ट्रॅक्टर चा चालक नामे संदीप रा. भातेवाडी ता. जि. बीड यांनी त्याचे ताब्यातील ट्रॅक्टर हा चालवून रोडवर आडवा आल्याने शिवकिरण शिरगुरे यांचा पिकअपची उजव्या बाजूने धडक बसून शिवकिरण शिरगुरे हे गंभीर जखमी होवून मयत झाले. फिर्यादी नामे–एकनाथ अशोक शिरगुरे, रा. हंगरगा नळ ता. तुळजापूर जि. धाराशिव यांनी दि.०७.०१.२०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन नळदुर्ग पो ठाणे येथे भा.न्या. सं. कलम १०६(१),२८१ सह १८४ मोवाका अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

### मोटारसायकलची चोरी

धाराशिव (प्रतिनिधी)– आनंदनगर पोलीस ठाणे अंतर्गत शरद उत्तम कुचेकर, वय ३६ वर्षे, रा. आपेगाव ता. अंबेजोगाई जि. बीड ह.मु.समर्थ नगर धाराशिव ता. जि. धाराशिव यांची अंदाजे २०,००० किंमतीची मोटरसायकल ही दि.०२.०१.२०२६ रोजी समर्थ नगर कांबळे निवास धाराशिव येथुन अज्ञात व्यक्तीने चोरुन नेली. अशा मजकुराच्या फिर्यादी शरद कुचेकर यांनी रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन आनंदनगर पो ठाणे येथे भा.न्या.सं.कलम ३०३(२) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

## पीसीपीएनडीटी कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी धाराशिव तालुक्याची कार्यशाळा उत्साहात संपन्न

धाराशिव, (जिमाका ) पीसीपीएनडीटी कायद्याची प्रभावी अंमलबजावणी होऊन लिंग गुणोत्तराचे प्रमाण सुधारावे व समाजात जनजागृती व्हावी या उद्देशाने धाराशिव जिल्ह्यात तालुकास्तरावर कार्यशाळांचे आयोजन करण्यात आले आहे.या उपक्रमांतर्गत आजपर्यंत सात तालुकास्तरीय कार्यशाळा यशस्वीरित्या पार पडल्या असून आज धाराशिव तालुक्याची कार्यशाळा जिल्हा रुग्णालयातील जिल्हा परिचारिका प्रशिक्षण सभागृहात उत्साहात संपन्न झाली.

जिल्हाधिकारी किर्ती किरण पुजार आणि जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.मैनाक घोष यांच्या सूचनेनुसार जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.धनंजय चाकूरकर यांच्या अध्यक्षतेखाली ही कार्यशाळा घेण्यात आली. पीसीपीएनडीटी कायद्याचे महत्त्व, त्याची प्रभावी अंमलबजावणी, गर्भलिंग निदानास प्रतिबंध तसेच लिंग गुणोत्तर सुधारण्याच्या उपाययोजनांवर यावेळी सविस्तर चर्चा करण्यात आली. या कार्यशाळेत धाराशिव तालुक्यातील सर्व सोनोग्राफी व एमटीपी केंद्रधारक, स्त्रीरोग तज्ज्ञ, शासकीय व खाजगी वैद्यकीय व्यावसायिक,आयएमए व एफओजीएसआयचे पदाधिकारी, तालुक्यातील समुदाय आरोग्य अधिकारी तसेच आशा कार्यकर्त्या सहभागी झाल्या होत्या.

यावेळी मार्गदर्शन करताना जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.धनंजय चाकूरकर यांनी लिंग गुणोत्तर संतुलित राखण्यासाठी विविध उपयोजना राबविण्याचे आवाहन केले तसेच खबरी योजनेद्वारे कायद्याच्या उल्लंघनाची माहिती देण्याबाबत जनजागृती करण्याचे महत्त्व अधोरेखित केले. डॉ.दत्तात्रय खुणे यांनी गावपातळीवर लिंग गुणोत्तर सुधारण्यासाठी सातत्याने प्रयत्न करण्याचे आवाहन केले.

पीसीपीएनडीटीचे नोडल अधिकारी डॉ.अनिल चव्हाण यांनी आशा कार्यकर्त्यांकडून तालुकानिहाय लिंग गुणोत्तराचा आढावा घेतला.तर विधी सल्लागार ड.रेणुका शेटे यांनी पीसीपीएनडीटी कायद्याच्या तरतुदींची माहिती दिली. या कार्यक्रमास अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. तानाजी लाकाळ, एफओजीएसआयचे अध्यक्ष डॉ. आदिनाथ राजगुरू,आयएमएचे अध्यक्ष डॉ.महेश कानडे,श्री.अमर सपकाळ यांच्यासह संबंधित अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

पीसीपीएनडीटी कायद्याचे उल्लंघन किंवा गर्भलिंग निदान करणाऱ्याची माहिती देणाऱ्या व्यक्तीस खातरजमा होऊन गुन्हा दाखल झाल्यास राज्य शासनामार्फत एक लाख रुपयांचे बक्षीस दिले जाते व माहिती देणाऱ्याचे नाव गोपनीय ठेवले जाते. यासाठी हेल्पलाईन क्रमांक १८००–२३३–४४७५ / १०४ किंवा ु.रालहळींश्रसळारहर. ळप या संकेतस्थळावर अथवा नजीकच्या ग्रामीण,उपजिल्हा किंवा जिल्हा शल्यचिकित्सक कार्यालयात संपर्क साधावा,असे आवाहन डॉ. धनंजय चाकूरकर यांनी केले आहे.

## रस्ता सुरक्षा अभियानात ऊस वाहतूक वाहनांवर रिफ्लेक्टर, पादचाऱ्यांना 'वॉक ऑन राईट'चे मार्गदर्शन

धाराशिव (जिमाका): रस्ता सुरक्षा अभियान २०२६ अंतर्गत जिल्हाभर विविध उपक्रम रस्ता सुरक्षा अभियान २०२६ अंतर्गत उपप्रादेशिक परिवहन कार्यालय, धाराशिव यांच्या वतीने दिनांक ०१/०१/२०२६ ते ०८/०१/२०२६ या कालावधीत जिल्हाभर विविध कार्यक्रम राबविण्यात आले.

मांजरा साखर कारखाना परिसरात ट्रॅक्टर–ट्रेलरला रिफ्लेक्टर लावण्याची विशेष मोहिम राबविण्यात आली. वायुवेग पथक क्र.२ मधील मोटार वाहन निरीक्षक श्री.उदयकुमार केंबळे व सहायक मोटार वाहन निरीक्षक यांनी ट्रॅक्टर–ट्रेलरला रिफ्लेक्टर टेप लावून त्याचे फायदे चालकांना समजावून सांगितले.

तसेच वायुवेग पथक क्र.४ मधील मोटार वाहन निरीक्षक श्री.सचिन बंग व सहायक मोटार वाहन निरीक्षक श्री.शिवाजी वहीर यांनी ऊस वाहतूक करणाऱ्या वाहनांना रिफ्लेक्टर लावून नागरिकांना रस्ता सुरक्षेबाबत सूचना व मार्गदर्शन केले.वायुवेग पथक क्र. १ व क्र.३ मधील श्री.सुशांत धुमाळे व सहायक मोटार वाहन निरीक्षक श्री. सिद्धेश्वर मस्के यांनीही ऊस वाहतूक वाहनांना रिफ्लेक्टर लावून चालकांना रस्ता सुरक्षेबाबत मार्गदर्शन केले.

**वरुडा रोड,धाराशिव येथे 'वॉक ऑन राईट' बाबत जनजागृती :**

धाराशिव शहरातील वरुडा रोड येथे पादचाऱ्यांना 'थरश्रज्ञ ेप ठळसहीं' संकल्पनेबाबत मोटार वाहन निरीक्षक श्री सुनील शिंदे,सहायक मोटार वाहन निरीक्षक श्री.विशाल भगरे व कार्यालयीन अधीक्षक श्री.नरसिंह कुलकर्णी यांनी मार्गदर्शन केले. यावेळी पादचाऱ्यांना माहितीपत्रके व बॅजचे वाटप करण्यात आले.

**तामलवाडी टोल नाका येथे रस्ता सुरक्षेबाबत प्रबोधन :**

तामलवाडी टोल नाका येथे मोटार वाहन निरीक्षक श्री.सुनील शिंदे व सहायक मोटार वाहन निरीक्षक श्री.विशाल भगरे यांनी टोल नाका कर्मचारी,वाहतूक पोलीस कर्मचारी व वाहन चालकांना रस्ता सुरक्षेबाबत प्रबोधन केले.यावेळी बॅनर प्रदर्शित करून माहितीपत्रके वितरित करण्यात आली.

यावेळी वाहन चालकांना वाहन चालविताना मोबाईलचा वापर टाळावा,दुचाकीस्वारांनी हेल्मेट वापरावे,चारचाकी वाहनचालकांनी सीट बेल्ट वापरावा,मद्यपान करून वाहन चालवू नये तसेच अपघातग्रस्तांना मदत करावी, याबाबत सविस्तर प्रबोधन करण्यात आले.

## नेटवर्कअभावी ऑनलाइनकामकाजात होते गैरसोय तुळजापूर न्यायालयातील कर्मचाऱ्यांना अडचणी

ढोकी (प्रतिनिधी) :मोबाइल टॉवर व ई–रिक्षा सुरू करणे गरजेचे तुळजापूर न्यायालय हे शहरापासून दोन ते अडीच किलोमीटर अंतरावर असल्याने एसटी महामंडळाने पक्षकारांना ये–जा करण्यासाठी सिटी बस अथवा ई–रिक्षा सुरू करणे गरजेचे आहे. त्या शिवाय या ठिकाणी कुठल्याही मोबाइल कंपनीचे टॉवर नसल्याने मोबाइल रेंज मिळत नाही व न्यायालयातील ऑनलाइनची कामे करताना मोठ्या अडचणी येत आहेत. त्यामुळे न्यायालय परिसरात मोबाइल कंपनीने टॉवर उभारण्याची गरज आहे. ड. नीलकंठ वट्टे प्रतिनिधी । काक्रंबा तुळजापूर नळदुर्ग रस्त्यावर हंगरगा तुळ गावच्या हदीत प्रशस्त मोकळ्या वातावरणात कोट्यवधी रुपये खर्चून सर्व सोयी–सुविधा उपलब्ध असलेली टोलेजंग तुळजापूर न्यायालयाची इमारत उभारण्यात आली आहे. सध्या याच ठिकाणांच्या इमारतीतून कामकाज सुरू झाले आहे. मात्र या न्यायालय इमारत परिसरात आसपास कोठेही मोबाइल टॉवर नसल्याने विधिज्ञ, पक्षकार, न्यायाधीश, अधिकारी कर्मचाऱ्यांच्या मोबाइलला रेंज मिळणे तर सोडाच. परंतु न्यायालयाचे सर्व कामकाजही ऑनलाइन असल्याने कामकाज करताना व्यत्यय निर्माण होत आहे. त्यामुळे विधिज्ञ पक्षकार न्यायाधीश अधिकारी कर्मचाऱ्यांना अडचणींना सामोरे जावे लागत आहे. तुळजापूर तालुक्यातील दिवाणी फौजदारी व अन्य विविध महत्त्वाचे कामकाज चालू होते. हे पूर्वीचे न्यायालय हे तुळजापूर शहरात छत्रपती शिवाजी महाराज चौकात बाजूला अपुऱ्या जागेत होते. आता सदरील न्यायालय इमारत ही तुळजापूर नळदुर्ग रस्त्यावर हंगरगा तुळ गावच्या हद्दीत शासकीय जागेवर कोट्यवधी रुपये खर्चून टोलेजंग सर्व सोयी–सुविधा उपलब्ध इमारत उभारण्यात आल्याने विधिज्ञ, पक्षकार, न्यायाधीश, अधिकारी कर्मचाऱ्यांनाही स्वतंत्र कक्षाची सोय झाली आहे. मात्र याच ठिकाणी न्यायालयातील पक्षकार न्यायाधीश विधिज्ञ कारकून यांना कामकाजाचा करतांना अथवा पक्षकारांशी संवाद साधताना मोबाइलला रेंज मिळत नसल्याने मोठ्या समस्याला तोंड द्यावे लागत आहे. नेटवर्क मिळत नसल्याने तातडीने जिओ, एअर टीएल, आयडीया, वोडाफोन यासह विविध महत्त्वाच्या कंपन्यांचे टॉवर उभारण्याची मागणी विधिज्ञ पक्षकार नागरिकांमधून होत आहे.





कोठेही व केंव्हाही वाचा latursamachar.com वर

ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

# लातूर समाचार

## भाजपाला तारणारा मुख्यमंत्र्यांचा दौरा!

लातूर महानगरपालिकेच्या निवडणुकीत भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चव्हाण यांनी बोलून जी भाजपाविषयी प्रेम होते ते कमी होत होते. भाजपाप्रदेशाध्यक्ष चव्हाण यांनी लातूरकरांच्या भावनेला हात घातला होता. प्रचंड नाराजगी निर्माण झाली होती. चव्हाण यांचा निषेध मोठ्या प्रमाणात करण्यात आला होता. राजकिय प्रचाराचे वातावरण दुषीत होत असताना राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा लातूर दौरा झाला व विराट सभेत मुख्यमंत्री फडणवीस यांचे भाषण झाले यामुळे लातूरकरांच्या मनात जी नाराजगी होती ती दूर होण्यास मदत होणार आहे. मुख्यमंत्र्याच्या दौऱ्याने राजकिय वातावरण बदलुन गेले आहे. भाजपाचे नगरसवेक काय परिणाम होईल याच्या चिंतेत होती. मुख्यमंत्र्यांच्या सभेमुळे जीवात-जीव आला आहे. वास्तविक रविंद्र चव्हाण यांना काय बोलायाचे किंवा काय सांगावयाचे होते हेच कळून येत नसावे. असो लातूरकरांचे दैवत असणारे विलासराव देशमुख यांच्या बाबत बोलण्याची गरज नव्हती. आजही विलासरावजींची जादू लातूरकरांच्या मनावर भिनलेली आहे म्हणून त्यांच्या नावाचा वापर कॉंग्रेस करीत होते. वास्तविक त्यांच्या नावाची गरज कॉंग्रेसने का पडावी? कारण त्यांनी विकास केला आहे. तो जाहिर आहे. लातूरकरासाठी काय-काय केले हे तसे सांगण्याची गरज नाही. दरवेळी मंत्रीमंडळाच्या बैठकित विकासाचा एक घास लातूरकरांसाठी राखुन ठेवला जात होता. हे काही कमी नव्हते. सर्वसाधारण व्यक्तीचा फोन विलासराव किती व्यस्त असले तरी उचलत होते. ही काही कमी जादू नव्हती. तसे भाजपाची सत्ता असताना ठोस असे सांगण्यासारखे विलासराव एवढे नाही हे कोठे तरी मान्यच केले पाहिजे. रेल्वे कोच निर्माण करण्याची फॅक्टरीतून अजून रेल्वेचा डब्बा निर्माण झाला व किंवा बाहेर पडला असून तरी नाही. तसे किमान गरजा पुर्ण करणे हे तर सरकारचे कर्तव्य आहे. मुलभूत गरजा पुर्ण केले पाहिजे. मग कोणाचेही सरकार असो! वास्तविक रविंद्र चव्हाण यांचे बोलणे अयोग्य होते हे मुख्यमंत्र्यांच्या सभेच्यावेळी केलेल्या वक्तव्याने सिद्ध होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आले व त्यांनी वातावरण बदलून गेले. मुळात भाजपाची प्रचारकमंडळी ही संघाच्या विचाराशी मिळती-जुळती आहे. भाजपाकडून चुक होणे अशक्य आहे. मग चव्हाणांकडून का झाली असा विचारसमोर येतो. कारण आलिकडे भाजपातील स्टार प्रचारक असो किंवा मोठ्या व्यक्तींना प्रशिक्षणाचा अभाव दिसून येतो. भाजपामध्ये पुर्वी कसे बोलावे, कोणतेमुद्दे हाताळावे व आपल्याशी मतदार कसे करावे या बाबत प्रशिक्षण दिले जात होते ती आता दिसून येत नाही. सहसा मत विरोधात जाईल असे वक्तव्य न करणारी मंडळी, सांभाळून बोलणारी मंडळी लोकभावनेच्या विरोधात बोलणे किती अंगलट येत हे चव्हाण यांच्या वक्तव्यवरून दिसून आले असणार! मुळात भाजपावाले अतिषय विचारपुर्वक मत व्यक्त करीत असतात. लातूरमध्ये भाजपाला अतिषय चांगले वातावरण होते. पंतप्रधान नरेंद्र मोदी व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर विश्वास जनतचा मोठा होता व आहे. असे असताना इतर मुद्दे असताना भावनिक मुद्दा उपस्थित करून ठेच पोंहविण्याचे काम चव्हाण यांच्यामुळे झाले हे कोठे तरी मान्यच केले पाहिजे. यापुढे कसे बोलावे या बाबत अनेकांना प्रशिक्षण देण्याची गरज आहे. आलिकडील भाजपातील मंडळी जी चव्हाणासारखी असेल तर यांना प्रशिक्षणाची गरज आहे. लातूरमध्ये अतिषय दुषीत वातावरण असताना योग्यवेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे भाषण झाले. त्यांनी जे मुद्दे उपस्थित केले. जे मार्गदर्शन केले त्यामुळे वातावरण फिरले आहे. बदल होत आहे. वास्तविक चव्हाण यांच्या वक्तव्यामुळे कॉंग्रेसला बळ मिळत होते याला ब्रेक लागणार आहे. मुख्यमंत्र्यांनी सुचक असे मुद्दे मांडले. मग लिंगायत समाजाचा प्रश्न असो किंवा अन्य विकासाचा मुद्दा मांडून जे रोख-ठोक आश्वासान दिले आहे याचा सकारात्मक परिणाम दिसून येणार आहे. केवळ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रचार सभेमुळे भाजपाला यश मिळण्याची शक्यता दिसून येत आहे. मुळात मुख्यमंत्री फडणवीस यांनी मोठे लांबलचक भाषण केले नाही. अतिषय अल्पवेळेत जनतेला भावणारे मुद्दे मांडले व आश्वासित केले. यामुळे चव्हाणावरील राग लातूरकरांचा कमी होणास मदत होणार आहे. तसे लातूरकरांना पिण्याचा पाण्याचा प्रश्न आहे. लिंगायत समाज मोठा आहे त्यांच्या स्मशानभूमीचा प्रश्न आहे, शहरातील गर्दीचा प्रश्न आदि जे महत्त्वाचे प्रश्न आहेत त्याची सोडवणुक करण्याचे आश्वासन दिले असल्याने भाजपा उमेदवारांच्यामनात जी धुक-धुक कमी होण्यास मदत होणार आहे. लातूरमध्ये कोण स्थानिक व कोण परका यावरचर्चा झाली. उमेदवारी देताना निष्ठावंतास डावल्याने मोठा संघर्ष निर्माण झाला. लातूरचा मतदार हा सुशिक्षिताबरोबर विचारकरून चालणारा आहे. त्यामुळे भाजपा असो किंवा कॉंग्रेसला मत देताना विचारपुर्वक मतदान करणार आहे. कॉंग्रेसने जनतेच्यामनातील भावना ओळखून जी वाटचाल करीत आहे याला जनतेचा पाठींबा मिळत आहे. कॉंग्रेसपेक्षा देशमुख परिवारांशी नाळ लातूरकरांशी जोडली आहे. एकतर ते उपद्रापी नाहीत. जनतेची कामे मग कोणती का असत नाहीत ते करण्याचा प्रयत्न असतो. तसा लातूरकरांना देशमुखांचा त्रास नाही. इतर ठिकाणाचे राजकिय वातावरण जे इतर ठिकाणी काही चुकीचा प्रकार चालतो तो लातूरात चालत नाही. मोठ्यांचा बाबतीत काही वेगळे असू शकेल मात्र जनतेच्या, सर्वसाधारणाच्यामनात देशमुख परिवाराबाबत आमुलकी आहे हे मान्यच केले पाहिजे. कारण ज्या पक्षाकडे सत्ता असते त्यांच्याकडे सर्वजन झुकतात हा निसर्गाचा नियम आहे. मात्र सध्याला यापरिस्थितीत भाजपा विरोधात कॉंग्रेस अशी फाईट जोरदार अटीतटीचे होणार आहे. चव्हाणांनी बिघडविले वातावरण सुधारत आहे. त्यामुळे कॉंग्रेसला जोर मारवा लागणार आहे. शेवटी जनतेच्यामनात काय आहे हे निवडणुक निकालानंतर कळणार आहे. सध्याचे वातावरण दोघात टाईट व फाईट आहे असेच दिसून येते. मुख्यमंत्र्याच्यासभेमुळे भाजपाला निश्चित पोषक वातावरण निर्माण होण्यास मदत होणार हे नक्की!

# केसगळती रोखण्यासाठी आजच फॉलो करा 'या' ५ सवयी, लगेच दिसेल फरक



आजकाल आधुनिक जीवनशैली आणि खाण्याच्या सवयींमुळे लांबलचक केस टिकवून ठेवणे अत्यंत कठीण झाले आहे. लाखो लोक केसांशी संबंधित समस्यांनी ग्रस्त आहेत. केस पांढरे होणे आणि केस गळणे यासारख्या केसांच्या समस्या सामान्य झाल्या आहेत. या समस्यांवर अद्याप कोणताही कायमस्वरूपी इलाज सापडलेला नाही.

परंतु केस गळती रोखण्यासाठी, जीवनशैलीच्या काही चुकीच्या सवयी बदलणे फयदेशीर ठरेल. आज, आम्ही तुम्हाला केस गळतीपासून आराम मिळवण्यासाठी तुम्ही करू शकता अशा काही गोष्टी सांगणार आहोत. चला या टिप्सबद्दल जाणून घेऊया..

प्रोटीन-

केसांची मुळे केराटिन नावाच्या प्रोटीनपासून बनलेले असतात. शरीरात अमीनो आम्लांच्या कमतरतेमुळे प्रोटीन आणि केराटिनचे उत्पादन बिघडते, ज्यामुळे केस गळतात. प्रोटीनयुक्त पदार्थ खाल्ल्याने केस गळती कमी होण्यास मदत होते. तुम्ही अंडी, मासे, दुग्धजन्य पदार्थ, बीन्स, नट असे अनेक पदार्थ खाऊ शकता.

व्हिटॅमिन्स

केसांसाठी व्हिटॅमिन्स आवश्यक आहेत. व्हिटॅमिन्सच्या कमतरतेमुळे केस गळती देखील होऊ शकते. जर तुम्हाला केस गळतीचा त्रास होत असेल तर आवश्यक व्हिटॅमिन्स पुरेशा प्रमाणात खाण्याची खात्री करा. व्हिटॅमिन सी आणि डी हे केसांसाठी सर्वात आवश्यक मानले जातात. फळे आणि भाज्यांसह या व्हिटॅमिन्सनी समृद्ध असलेले पदार्थ खाऊन तुम्ही केस गळतीपासून आराम मिळवू शकता.

नियमित स्वच्छता-

स्वच्छतेचा अभाव देखील केस गळतीचे एक प्रमुख कारण आहे. घाण आणि प्रदूषण देखील केस गळतीस कारणीभूत ठरू शकते. ही समस्या टाळण्यासाठी, तुमचे केस आणि टाळू स्वच्छ ठेवणे अत्यंत महत्वाचे आहे. केस तुटण्यापासून रोखण्यासाठी, तुम्ही नियमितपणे योग्य शॅम्पू आणि कंडिशनरने तुमचे केस स्वच्छ करावेत.

केसांची स्टाईल-

तुमच्या केसांच्या स्टाईलमुळे केस गळती होऊ शकते. त्यामुळे केस गळणे टाळण्यासाठी याचा विचार केला पाहिजे. महिलांसाठी, पोनीटेल आणि घट्ट वेण्या त्यांच्या केसांच्या मुळांना ओढू शकतात आणि जास्त काळ तीच स्टाईल राखल्याने केस गळू शकतात. कर्लिंग किंवा स्ट्रेटनिंगसारखे हीट स्टायलर देखील केसांच्या मुळांना नुकसान पोहोचवू शकतात, म्हणून त्यांचा योग्य वापर करा.

ताणतणाव कमी करा

तणाव आणि चिंता देखील केस गळतीस कारणीभूत ठरू शकते. जे लोक खूप तणावाखाली असतात त्यांना केस गळतीचा अनुभव येऊ शकतो. ही समस्या टाळण्यासाठी, तुम्हाला ताण आणि चिंता कमी करणे आवश्यक आहे. यासाठी, तुम्ही नियमित व्यायाम आणि योगासने इत्यादींचा अवलंब करू शकता.

# किडनी निरोगी ठेवण्यासाठी खा कमी पोटॅशिअम असलेले पदार्थ, 'हे' आहेत उत्तम पर्याय

किडनी रक्तातील द्रव स्वरूपातील घाण फिल्टर करतात आणि तो मूत्राच्या स्वरूपात शरीराबाहेर टाकतात. किडनी रक्तातील अतिरिक्त पोटॅशियम देखील काढून टाकतात. जास्त पोटॅशियम सेवन केल्याने किडनीच्या कार्यावर नकारात्मक परिणाम होऊ शकतो. किडनीचे आरोग्य राखण्यासाठी, पोटॅशियमयुक्त पदार्थांचे सेवन टाळा.विशेषतः ज्यांच्या किडनी खराब काम करतात.

किडनी जेव्हा कमकुवत असतात तेव्हा शरीर पोटॅशियम योग्यरित्या उत्सर्जित करू शकत नाही. म्हणून, पोटॅशियमची पातळी नियंत्रित करण्यासाठी आणि किडनीचे आरोग्य राखण्यासाठी, कमी पोटॅशियमयुक्त पदार्थांचे सेवन करा. आज आम्ही तुम्हाला अशा निरोगी पदार्थांबद्दल सांगणार आहोत जे किडनीसाठी फायदेशीर मानले जातात आणि त्यामध्ये पोटॅशियमचे प्रमाण देखील कमी असते

अक्रोड-

किडनी निरोगी ठेवण्यासाठी अक्रोड नक्की खा. अक्रोडमध्ये प्रथिने, लोह, मॅग्नेशियम, फॉस्फरस आणि व्हिटॅमिन ई सारखे पोषक घटक असतात. अक्रोडमध्ये फॉस्फरसचे प्रमाण जास्त नसते. म्हणून ते किडनीच्या आरोग्यासाठी फायदेशीर मानले जातात. अक्रोडमध्ये फ्लेव्होनॉइड्स असतात, जे ऑक्सिडेटिव्ह ताण कमी करण्यास मदत करतात.

सफरचंद-

किडनी निरोगी ठेवण्यासाठी सफरचंद फायदेशीर आहे. सफरचंद खाल्ल्याने किडनीचे कार्य सुधारते. सफरचंदांमध्ये व्हिटॅमिन सी आणि क्वेर्सेटिन सारखे पोषक घटक असतात. हे पोषक घटक जळजळ आणि ऑक्सिडेटिव्ह ताण कमी करण्यास मदत करतात. सफरचंद खाल्ल्याने पचनक्रिया सुधारते आणि रक्तातील साखरेची पातळी नियंत्रित करण्यास मदत होते. सफरचंदांव्यतिरिक्त, नाशपाती देखील किडनीसाठी फायदेशीर आहेत.

काकडी-

किडनी निरोगी ठेवण्यासाठी काकडीसुद्धा उपयुक्त आहे. काकडीमध्ये ९५ टक्के पाणी असते. किडनीचे कार्य सुधारण्यासाठी काकडी खाणे फायदेशीर आहे. काकडीमध्ये सोडियमचे प्रमाण कमी असते,.जे रक्तदाब नियंत्रित करण्यास मदत करते आणि किडनीवर जास्त ताण टाळते.

ढोबळी मिरची-

किडनी निरोगी ठेवण्यासाठी, तुम्ही व्हिटॅमिन सी युक्त पदार्थ खावेत. आणि ढोबळी मिरचीमध्ये व्हिटॅमिन सी भरपूर असते. ढोबळी मिरची खाल्ल्याने रोगप्रतिकारक शक्ती मजबूत होते आणि जळजळ कमी होते. शिमला मिरची खाल्ल्याने वजन नियंत्रणात राहण्यास आणि किडनीचे कार्य सुधारण्यास देखील मदत होते.

# अंड उकळल्यानंतर पाणी फेकून देता पाण्याचे फायदे जाणून घ्या



अंडा हा व्हेज आणि नॉनव्हेज दोन्हीमध्ये मोडतो. त्यामुळे बहुतांश लोकं अंड्याचे सेवन करतात. अनेकजण अंडी उकळून खाणे पसंत करतात. पण अंड्याशी संबंधित काही खास गोष्टी तुम्हाला माहित आहेत का

तुम्ही देखील अंडी उकळल्यानंतर ते फेकून देत असाल, तर ही बातमी तुमच्यासाठी महत्त्वाची आहे. अंडी उकळल्यानंतर आपण ते पाणी सहज फेकून देतो. पण असं न करता त्या अंड्याचा योग्य तो वापर केल्यास त्याचे जबरदस्त फायदे अनुभवता येतील.

पोषकतत्त्व

अंड्याच्या टरफलांमध्ये योग्य प्रमाणात कॅल्शियम, पोटॅशियम आणि योग्य प्रमाणात फॉस्फरस, कॅल्शियम आणि सोडियम असेत. अशावेळी आपण अंडी उकळतो तेव्हा त्यातील जीवनसत्त्वे त्या पाण्यात उतरतात. ही जीवनसत्वे असलेलं पाणी जर झाडांना घातला तर त्याचा फायदा झाडांना मिळतो. झाडांची चांगली वाढ होते. फुलं, फळं मुबलक प्रमाणात येतात.

खत म्हणून होतो वापर

उकळलेल्या अंड्यांची टरफल आणि अंड्याचे उकळलेले पाणी दोन्ही खतासमान आहेत. एका संशोधनात याचा खुलासा झाला आहे. मास्टर्स गार्डेनर ऑफ हेमिल्टनद्वारे माहिती जाहीर केली आहे. या अभ्यासानुसार, तुम्ही ज्या पाण्यात अंडे उकळता त्या पाण्यातील पोषकतत्त्वांचा फायदा झाडांना होतो. हे खत अतिशय फायदेशीर ठरते. टोमॅटोच्या झाडांसाठी फायदेशीर ज्या झाडांना योग्य प्रमाणात ऊन मिळ नाही त्यांच्यासाठी हे पाणी अतिशय फायदेशीर असते. एका संशोधनात असे समोर आले आहे की, हे पाणी टोमॅटोच्या झाडांना वापरले तर त्याचा फायदा झाडांना होतो. चांगल्या प्रतीचे टोमॅटो झाडाला येतात. तसेच मिरचीच्या झाडाला देखील याचा फायदा होतो.

अंडे मानवी शरीरासाठी जसे उपयोगी आणि फायदेशीर आहे. अगदी तसेच ते झाडांसाठी देखील महत्त्वाची भूमिका बजावतात. तुम्ही तुमच्या घरातील छोट्या गार्डनला हा प्रयोग नक्कीच करुन पाहू शकता. कारण घरच्या गार्डनला याचा नक्कीच फायदा होतो. त्यामुळे आजपासून ही बातमी वाचल्यानंतर अंड्याच्या टरफलांचा आणि त्याच्या उकळलेल्या पाण्यांचा नक्की वापर करा.

## हिंद-दी-चादर श्री गुरु तेग बहादूर साहिब जी: ३५० वे शहिदी समागम शताब्दी वर्ष आणि राज्यव्यापी सोहळा - मनोज सुमन शिवाजी सानप

''हिंद-दी-चादर'' श्री गुरु तेग बहादूर यांच्या ३५० व्या शहिदी समागम शताब्दी वर्षानिमित्त राज्यातील नांदेड, नागपूर व नवी मुंबई, जि. ठाणे येथे राज्य शासनाच्या अल्पसंख्याक विकास विभाग व ''हिंद-दी-चादर श्री गुरु तेग बहादूर साहिब जी ३५० वी शहिदी समागम शताब्दी राज्यस्तरीय समिती'', शीख- सिकलीकर, बंजारा लबाना, मोहियाल, सिंधी व इतर सर्व समाज यांच्या संयुक्त विद्यम ाने या विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार आहे.

श्री गुरु तेग बहादूर हे शीख धर्माचे ९ वे गुरू होते, त्यांना ''हिंद-दी-चादर'' म्हणून ओळखले जाते. श्री गुरु तेग बहादूर यांनी शीख धर्मात प्रार्थना, परोपकार, सेवा, साधेपणा, इतरांच्या सेवेला महत्त्व आणि निर्भीडपणा यांचा प्रचार केला, त्यांचे प्रवचन व भजन यांचा ''गुरु ग्रंथ साहिब'' यामध्ये देखील समावेश आहे. श्री गुरु तेग बहादूर यांनी १७ व्या शतकामध्ये तत्कालीन शासनकर्त्यांच्या अन्याय व अत्याचाराविरूद्ध आवाज उठवून धर्मस्वातंर्त्य आणि मानवी हक्कांसाठी बलिदान देऊन भारताच्या सांस्कृतिक व आध्यात्मिक अस्मितेचे रक्षण केले. त्यांच्या बलिदानामुळे संपूर्ण भारतात तसेच शीख धर्मात शौर्य आणि त्यागाची परंपरा अधिक बळकट झाली. मुघल स्म्राटांच्या विरोधात जावून भाई लकीशा बंजारा यांनी नववे गुरु तेग बहादूर यांच्या पवित्र शरीरास आपला तांडा व घर जाळून अग्नी दिला. या बाबीस भारतीय इतिहासात अनन्यसाधारण महत्त्व आहे.

श्री गुरु तेग बहादूर यांचे सन २०२५ हे ३५० वे शहिदी समागम शताब्दी वर्ष असल्याने त्यांचा गौरवशाली इतिहास सर्वांना माहित व्हावा तसेच त्यांनी केलेला प्रचार व दिलेले बलिदान याचे स्मरण होण्याकरिता विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्याकरिता ''हिंद-दी-चादर श्री गुरु तेग बहादूर साहिब जी ३५० वी शहिदी समागम शताब्दी तसेच गुरु गोविंदसिंग, गुरु-ता-गद्दी समागम समि ती यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना विनंती केली. त्यानुषंगाने मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली दि.१३ जून २०२५ रोजी ''हिंद-दी-चादर श्री गुरु तेग बहादूर साहिब जी ३५० वी शहिदी समागम शताब्दी तसेच गुरु गोविंदसिंग, गुरु-ता-गद्दी समागम समितीची याबाबत बैठक आयोजित करण्यात आली. या बैठकीच्या अनुषंगाने विविध कार्यक्रमांचे आयोजन करणे तसेच कार्यक्रमाच्या आयोजनाकरिता, राज्यस्तरीय समन्वय समिती, क्षेत्रीय आयोजन समिती व विविध कार्यक्रम आयोजन व्यवस्था समिती इ. समित्या दि. १२ ऑगस्ट २०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये स्थापन करण्यात आल्या आहेत.

''हिंद-दी-चादर श्री गुरु तेग बहादूर यांच्या ३५० व्या शहिदी समागम शताब्दी वर्षानिमित्त राज्यातील नांदेड, नागपूर व नवी मुंबई, जि. ठाणे येथे राज्य शासनाच्या अल्पसंख्याक विकास विभाग व ''हिंद-दी-चादर श्री गुरु तेग बहादूर साहिब जी ३५० वी शहिदी समागम शताब्दी राज्यस्तरीय समिती'', शीख- सिकलीकर, बंजारा लबाना, मोहियाल, सिंधी व इतर सर्व समाज यांच्या संयुक्त विद्यम ाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार आहे.

कार्यक्रमाचे ठिकाण व त्यात समाविष्ट असलेले जिल्हे :-

नांदेड – छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, जालना, लातूर, धाराशिव, हिंगोली, बीड, नंदुरबार, धुळे, जळगाव

नागपूर – वर्धा, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर, गडचिरोली, अकोला, अमरावती, बुलढाणा, यवतमाळ, वाशिम

नवी मुंबई – मुंबई शहर, मुंबई उपनगर, ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदूर्ग, पुणे, सातारा, सांगली, सोलापूर, कोल्हापूर, अहिल्यानगर, नाशिक

''हिंद-दी-चादर श्री गुरु तेग बहादूर यांच्या ३५० व्या शहिदी समागम शताब्दी वर्षानिमित्त राज्यातील नांदेड, नागपूर व नवी मुंबई, जि. ठाणे येथे राज्य शासनाच्या अल्पसंख्याक विकास विभाग व ''हिंद-दी-चादर श्री गुरु तेग बहादूर साहिब जी ३५० वी शहिदी समागम शताब्दी राज्यस्तरीय समिती शीख-सिकलीकर, बंजारा लबाना, म ोहियाल, सिंधी व इतर सर्व समाज यांच्या संयुक्त विद्यमाने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार आहे.

हिंद-दी-चादर श्री गुरु तेग बहादूर साहिब जी यांच्या ३५० व्या शहिदी समागम शताब्दी वर्षानिमित्त नांदेड, नागपूर व नवी मुंबई येथे आयोजित करण्यात येणाऱ्या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाकरिता आवश्यक शिफारशी करण्यासाठी नांदेड, नागपूर व नवी मुंबई जि. ठाणे या तीन ठिकाणी क्षेत्रीय आयोजन समिती स्थापन करण्यात आली आहे.

क्षेत्रीय आयोजन समितीची कार्यकक्षा :- नवी मुंबई, जि. ठाणे या ठिकाणी होणाऱ्या कार्यक्रमांच्या आयोजनाकरिता वेळोवेळी आढावा घेवून कालबद्ध कार्यक्रम निश्चित करणे,

कार्यक्रमाच्या अनुषंगाने मार्गदर्शक समिती तसेच आयोजन व्यवस्थापन समित्या स्थापन करण्यासाठी जिल्हास्तर आयोजन व व्यवस्थापन समितीस शिफारस करून त्यांची वेळोवेळी आढावा बैठक घेणे व त्याची माहिती राज्यस्तरीय समितीस व अल्पसंख्याक विकास विभागास सादर करणे.

या कार्यक्रमाचे योग्य नियोजन, परिणामकारक अंम लबजावणी याकरिता आयोजन समन्वय समिती, व्हीआयपी व्यवस्थापन समिती, सभागृह व्यवस्थापन समिती, प्रशासन व्यवस्थापन समिती, मैदान व्यवस्थापन समिती, मंडप व्यवस्थापन समिती, बैठक व स्वागत व्यवस्थापन समिती, अतिथी व्यवस्थापन समिती, निवास व्यवस्थापन समिती, नाव नोंदणी व्यवस्थापन समिती, प्रदर्शनी व्यवस्थापन समि ती, प्रचार व प्रसार व्यवस्थापन समिती, दक्षता व्यवस्थापन समिती, महिला सुरक्षा व्यवस्थापन समिती, आपात्कालीन व्यवस्थापन समिती, पाणीपुरवठा व्यवस्थापन समित्ती, स्वच्छता व्यवस्थापन समिती, स्वरुपा व्यवस्थापन समि ती, सार्वजनिक परिवहन व्यवस्थापन समिती, जूताघर व्यवस्थापन समिती, लंगर व्यवस्थापन समिती तसेच स्थानिक कार्यक्रमाच्या अनुषंगाने आवश्यकता असलेल्या समित्या स्थापन करण्यासाठी जिल्हास्तर आयोजन व व्यवस्थापन समितीस शिफारस करणे.

हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या ु.ारहरीरिहींर. सीं.ळप या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२५१०१०१८५९४२७८१४ असा आहे. तरी या सोहळ्यामध्ये जास्तीत जास्त नागरिकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हा प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

# लिपस्टिक लावताना या चुका करू नका

लिपस्टिक लावताना या चुकांकडे दुर्लक्ष करू नका कोणत्याही महिलेचे सौंदर्य वाढवण्यात लिपस्टिक खूप महत्त्वाची भूमिका बजावते. पार्टी,ऑफिस आणि लग्न यांसारख्या प्रसंगी कोणत्याही स्त्रीला सुंदर दिसण्यासाठी लिपस्टिक खूप महत्त्वाची असते. आपण लिपस्टिकचा गडद रंग वापरा किंवा न्यूड रंग, लिपस्टिक हा मेकअपचा महत्त्वाचा भाग आहे.

सुंदर त्वचेसाठी लावा हे स्ट्रॉबेरी मास्क लिपस्टिक लावल्यानंतर निस्तेज चेहरा देखील चमकतो. या साठी केवळ चांगल्या दर्जाची लिपस्टिकच नाही तर ती योग्य पद्धतीने लावायला हवी. अनेक वेळा लिपस्टिक लावल्यानंतरही चेहऱ्यावर चमक येत नाही, याचे एक कारण म्हणजे चुकीच्या पद्धतीने लिपस्टिक लावणे आहे. चला तर मग लिपस्टिक लावण्याची योग्य पद्धत जाणून घेऊ या.

वासाने भारतीय विद्यार्थ्यांना व्हिसा रद्द आणि हद्दप-ारीचा कडक इशारा दिला डायबिटीज मैनेज नहीं



हो रही? फ़िक्र न करें, इसे लेना शुरू करें और जानें ✻ मॅट लिपस्टिक लावण्यापूर्वी ओठांवर मॉइश्चरायझर लावा- सध्या मॅट लिपस्टिक ट्रेंडमध्ये आहे. मॅट लिपस्टिक लावल्यानंतर ओठ थोडे कोरडे होतात. लिपस्टिक लावण्यापूर्वी ओठांवर मॉइश्चरायझर लावा. यामुळे ओठ मऊ आणि कोमल होतील आणि सुंदर दिसतील. **प्रत्येक मुलीने हे ७ मेकअप टूल्स आपल्याकडे ठेवावे**

✻ काळ्या ओठांवर लिपस्टिक कशी लावायची- मृत त्वचा आणि पिगमेंटेशनमुळे ओठांचा रंग गडद होतो. काळ्या ओठांवर लिपस्टिकचा रंग येत नाही. अशा परिस्थितीत लिपस्टिक लावण्यापूर्वी ओठांवर कन्सीलर आणि फाउंडेशनचा बेस लावा. यानंतर आपली आवडती लिपस्टिक ओठांवर लावा. असं केल्याने ओठ सुंदर दिसतील.


✻ लिप लाइनर चा वापर- परफेक्ट लिपस्टिक लावण्यासाठी लिप लायनरचा वापर करावा. लिपस्टिक लावण्यापूर्वी लिप लाइनरने ओठांची रेषा काढा. त्यानंतर लिपस्टिक लावा. लिप लाइनर नेहमी लिपस्टिकच्या शेडशी जुळणारे असावे. पातळ ओठ असलेल्या महिला मोठ्या आणि जाड ओठा दिसण्यासाठी लिप लाइनर वापरू शकतात. चमकदार त्वचेसाठी गुलाबाच्या पानांचा वापर करून गुलाबजल तयार करा

✻ लिप ब्रशने लिपस्टिक लावा- काहीवेळा थेट ओठांवर लिपस्टिक लावल्याने लिपस्टिक पसरते,आपण ब्रशच्या मदतीने लिपस्टिक लावू शकता. ब्रशच्या मदतीने आपण ओठांना आकार देऊ शकता. बऱ्याच स्त्रियांना ब्रशने लिपस्टिक कशी लावायची हे माहित नसते. पण आपण ब्रशने अगदी सहजरित्या लिपस्टिक लावू शकता. ब्रशने लिपस्टिक लावण्यासाठी, ओठांच्या वर त आकारात ब्रश सुरू करा. यानंतर ब्रशच्या मदतीने ओठांच्या दोन्ही कोपऱ्यांना लिपस्टिक लावा. यानंतर खालच्या ओठांवर ब्रशने लिपस्टिक लावा

✻ अतिरिक्त लिपस्टिक काढा- लिपस्टिक लावल्यानंतर ओठांवरची अतिरिक्त लिपस्टिक काढून टाकणे आवश्यक आहे. लिपस्टिक काढण्यासाठी आपण टिश्यू पेपर वापरू शकता. टिश्यू पेपर घ्या आणि ओठांवर दाबा, असं केल्याने अतिरिक्त लिपस्टिक निघून जाईल.

अस्वीकरण : या लेखात दिलेली माहिती आणि उपाय सामान्य माहितीवर आधारित आहे. या माहितीची पूर्णता, विश्वासार्हता आणि अचूकता याबाबत लातूर समाचार कोणतीही हमी देत नाही. अधिक माहितीसाठी संबंधित तज्ज्ञांचा सल्ला घ्यावा.

## फुफ्फुस निरोगी ठेवण्यासाठी



फुफ्फुस निरोगी ठेवण्यासाठी धूम्रपान सोडा, धूळ-प्रदूषण टाळा, भरपूर पाणी प्या, हिरव्या पालेभाज्या, लिंबूवर्गीय फळे, गाजर खा आणि आले-लिंबू-मध यांचा चहा घ्या; नियमित व्यायाम, योग आणि दीर्घ श्वास घेण्याचे व्यायाम करा; तसेच, श्वसनमार्गातील जळजळ कमी करण्यासाठी डॉक्टरांच्या सल्ल्याने दाहक-विरोधी औषधे घेऊ शकता, असे आयुर्वेदिक आणि वैद्यकीय सल्ले सांगतात. जीवनशैली आणि सवयी

धूम्रपान सोडा: फुफ्फुस स्वच्छ ठेवण्यासाठी धूम्रपान सोडणे सर्वात महत्त्वाचे आहे.

प्रदूषण टाळा: धूळ आणि प्रदूषण असलेल्या ठिकाणी जाणे टाळा.

नियमित व्यायाम: चालणे, धावणे आणि योग केल्याने फुफ्फुसांची क्षमता वाढते.

दीर्घ श्वसन: रोज दीर्घ श्वास घेण्याचे व्यायाम करा.नास्य करा: आयुर्वेदिक उपचारांनुसार नाकात औषधी तेल टाकणे फायदेशीर ठरू शकते.

## रडण्याचे देखील फायदे आहे

रडणे ही मानवाची एक सामान्य क्रिया आहे, जी अनेक वेगवेगळ्या भावनांमुळे उत्तेजित होते. पण तुम्ही कधी विचार केला आहे का की माणसं का रडतात? संशोधकांना संशोधनात असे आढळून आले आहे की, रडण्याने आपले शरीर आणि मन या दोन्हींचा फायदा होतो.

-ड्ज ठए-ऊ थळपींशी वीळपज्ञी: सर्दी आणि फ्लू टाळण्यासाठी या ३ पेयांपैकी एक प्या

अनेक गोष्टींवर रडायचे असेल तर पुरुष ते रडणे रोखतात, पण मुले आणि महिला रडायला लागतात,अनेकांना सहज रडायला येते. कारण ते जास्त भावनिक असतात. रडणे देखील चांगले आहे. थोडा वेळ रडल्यानंतर तुम्हाला हलके वाटू लागते. चला तर मग जाणून घेऊया रडण्याने तुमच्या आरोग्यासाठी कोणते फायदे आहेत. रडण्याचे फायदे जाणून घ्या.



-ड्ज ठए-ऊ हिवाळ्यात शेकोटी जीवघेणी ठरू शकते; थोडीशी निष्काळजीपणाही महागात पडू शकते.

१ रडल्याने पॅरा-सिम्पेथेटिक मज्जासंस्था सक्रिय होते, जे मन शांत करते आणि पचन सुधारते

२ लाइसोझाइम नावाचा पदार्थ अश्रूंमध्ये आढळतो. हे डोळ्यांतील बॅक्टेरिया काढून टाकून डोळ्यांना शांत करते.

३ रडल्याने शरीरातील एंडोर्फिन, ल्युसीन एन्कार्फेलिन, प्रोलॅक्टिन सारख्या घटकांची पातळी कमी होते, ज्यामुळे तणाव कमी होण्यास मदत होते. ४ रडल्याने तुमचे दुःख कमी होऊन आराम मिळतो. रडल्यानंतर तुम्हाला हलके वाटते आणि आनंदी वाटते. ५ जेव्हा दुःखी असता तेव्हा नैराश्यामुळे शरीरात हानिकारक घटक तयार होतात. जेव्हा आपण रडतो तेव्हा हे घटक शरीरातून बाहेर पडतात.

६ उच्च रक्तदाबाच्या रुग्णांसाठी रडणे फायदेशीर आहे, ते रक्तदाब सामान्य करण्यासाठी उपयुक्त आहे.७ रडल्याने मनःस्थिती सुधारते आणि भावना संतुलित होतात. ८ रडल्याने दुःखावर मात करण्यात मदत होते आणि शरीरातील वेदना कमी होतात.

## मतदार गेले तरी कोठे?



मतदाराचे नाव सुधारित यादीत समाविष्ट करतानाच तो देशाचा नागरिक आहे की नाही हे तपासण्याचे अधिकारही आपल्याला असल्याचा आयोगाचा दावा बघता या मोहिमेच्या हेतूबद्दल संशय येतो.

उत्तर प्रदेशासह ९ राज्ये व तीन केंद्र शासित प्रदेशांच्या मतदार याद्यांचा मसुदा निवडणूक आयोगाने प्रसिद्ध केला आहे. आधी नोंदलेल्यांपैकी ६ कोटी ५६ लाख मतदारांची नावे नव्या यादीतून वगळण्यात आली आहेत. मतदार याद्यांची विशेष तीव्र पडताळणी मोहीम गेल्या वर्षी सप्टेंबरमध्ये बिहारमध्ये राबवण्यात आली. त्या वेळी ८.३ टक्के मतदारांची नावे कमी करण्यात आली होती. दुसर्या टप्प्यात १३ टक्के नावे वगळली आहेत. या बारा राज्यांतील मतदारांची संख्या ५० कोटी ९० लाखांवरून ४४ कोटी ४० लाख झाली आहे. टक्केवारीत अंदमान निकोबार प्रथम आहे. तेथील २०.६० टक्के मतदार कमी झाले आहेत. उत्तर प्रदेशात कमी केलेल्या नावांची संख्या सर्वांत जास्त, २ कोटी ८९ लाख आहे. म्हणजे १९ टक्के नावे कमी झाली आहेत. मतदार वगळण्याच्या बाबतीत गुजरातचा तिसरा क्रमांक आहे. कायमस्वरूपी स्थलांतर, मृत्यू, पडताळणीच्या वेळी उपस्थित नसणे, एका पेक्षा जास्त वेळा नाव असणे ही कारणे निवडणूक आयोगाने नावे वगळण्यासाठी दिली आहेत. उत्तर प्रदेशात मसुद्यात नाव असलेल्या १ कोटी ४० लाख जणांना पुन्हा कागदपत्रे सादर करण्यास सांगितले जाणार आहे. मतदारांच्या नागरिकत्वाची पडताळणी करण्याचा अधिकारही आपल्याला असल्याचा निवडणूक आयोगाचा दावा वादग्रस्त ठरत आहे.

प्रक्रियेवर प्रश्न

निवडणूक लोकसभेची असो किंवा स्थानिक स्वराज्य संस्थेची असो; प्रत्येक वेळी मतदार यादीत सुधारणा केली जाते. दुबार नाव असणे किंवा मृत्यू अशा कारणांसाठी नावे वगळणे आणि नव्या पात्र मतदारांची नावे समाविष्ट करणे अशी ही सुधारणा प्रक्रिया असते. त्यातही दोष राहू शकतात हे गृहीत धरून विशेष तीव्र पडताळणी मोहीम राबवली जाते. मतदार यादी निर्दोष असावी हा त्या मागचा हेतू असतो तो गैर म्हणता येणार नाही. मात्र या वेळची ही मोहीम प्रथमपासून संशयाच्या व वादाच्या भोवर्यात सापडली. अनेक कागदपत्रांची मागणी त्रासदायक असल्याचा आक्षेप मुख्य होता. पात्रता सिद्ध करण्याची जबाबदारी मतदारांवर टाकली गेली. २००२-०५ या काळात तयार केलेल्या मतदार याद्या आताच्या यंत्रांना 'वाचता' येत नाहीत. त्यामुळे त्या याद्या कालबाह्य झाल्या. डिजिटल तंत्रज्ञानामुळे मतदार यादी सुधारणा वेगाने होऊ शकते हे मान्य केले तरी अनेक मतदार आपला किंवा आपल्या पालकांचा संदर्भ देण्यास असमर्थ ठरत अहेत हे वास्तव आहे. माहितीतील किरकोळ बाब जरी जुळली नाही तरी नाव कमी केले गेल्याच्या तक्रारी आहेत. हरकत नोंदवण्यास 'अपील' करण्यास सांगितले जाते. पण याही टप्प्यावर ज्याचे नाव यादीत नाही त्यालाच पुरावे सादर करण्यासाठी यातायात करावी लागते. बिहारमध्ये दुबार नावे शोधण्यासाठी आयोगाने जे सॉफ्टवेअर वापरले त्याबद्दल तक्रारी आल्यानंतर आपण ते सॉफ्टवेअर वापरणे बंद केल्याचे आयोगाने सर्वोच्च न्यायालयास सांगितले होते. मात्र जुन्या यादीशी तुलना करून ज्यांची पडताळणी झाली नाही (अनमॅच्ड) अशा मतदारांना शोधण्यासाठी वापरलेल्या अन्य सॉफ्टवेअरच्या बरोबरीने जुने सॉफ्टवेअरही आयोगाने वापरले. १२ राज्यांत तोच प्रयोग आयोगाने केला का? हे स्पष्ट नाही. त्यामुळे या राज्यांतील ६ कोटी ५० लाख मतदार वगळण्याच्या पद्धतीत व तिच्या अंमलबजावणीत दोष असल्याचे जाणवते. उत्तर प्रदेशात वगळलेल्या नावांची संख्या जास्त असल्याने मसुदा प्रसिद्ध करणे तीनदा पुढे ढकलण्यात आला असा संशय घेता येतो. पडताळणी करण्यासाठी ज्येष्ठ नागरिकांनाही दूरच्या ठिकाणी जावे लागण्याच्या घटना पश्चिम बंगालमध्ये घडल्या.

प्रसिद्ध क्रिकेटपटू महमद शमी यास त्यासाठी कोलकात्यात येण्याचे समन्स आयोगाने पाठवल्याची घटना ताजी आहे. नाव समाविष्ट करण्यासाठी होणारी गर्दी बघता नावे नोंदवण्याची प्रक्रिया योग्य रीती-ने राबवली नाही हे जाणवते. ज्यांचे नाव स्थलांतराच्या कारणाने एका ठिकाणी वगळले त्याचे नाव दुसर्या राज्यात मतदार यादीत समाविष्ट होणार का याची खात्री नाही. ज्यांची नावे नाहीत ते मतदार कोठे गेले या प्रश्नाचे समाधानकारक उत्तर मिळणे आवश्यक आहे.

## १ Doctor Tips सल्ला डॉक्टरचा

**सहवास न करताही होऊ शकतात हे लैंगिक आजार !**



STD चे सामान्य प्रकार आणि ते पसरण्याचे मार्ग: 1. Gonorrhoea and Chlamydia Gonorrhoea and Chlamydia याप्रकारचे इन्फेकशन साधारणपणे ओरल सेक्स किंवा शारीरिक संबंधांमुळे पसरते. गर्भारावस्थेत आईला झाले असेल तर बाळाला होऊ शकते.

**टीप:** ओरल- व्हेजीनल सहवास करताना डेंटल डॅम्स वापरल्यास इन्फेकशन होण्याचा धोका कमी होतो.

## २ Joke विनोद





डार्लिंग एक किस देतेस का

नवीन लग्न झालेले जोडपे हनिमूनला जाते...

नवरा एकदम रॉमेंटीक शैलीत नवरीला म्हणतो - "May I kiss you... Darling ?

नवरी लाजून म्हणते - ठहमने तो कभी गैरों को भी मना नहीं कियाआप तो फिर भी अपने हो जी!

## ३ Message संदेश



Aakhri Khuwahish
Marty Huwe Sharabi Se
Bhagwan Ny Us Ki Aakhri Khuwa-hish Puchi..
Sharabi: Agly Janam Me
Mujhy Daant Beshak Ek Hi Dena,
Magar Liver 32 Dena..
Ek Dety Ho,
Sala Itni Jaldi Kharab Ho Jata Hai..

## ४ Thought सुविचार



बुद्धी आणि भावना यांचा समन्वय साधता येणे ही जीवनकला आहे.


**- शांताराम आठवले**

**संस्कृत सुभाषित**

सुखा अंग देऊ नये । प्रयत्न पुरुष सांडू नये

**अर्थ -** धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष या चतुर्विध पुरुषार्थाची प्राप्ती हवी तर परिश्रम केलेतच पाहिजे.

## मनोरंजक महाशब्दकोडे



### आडवे शब्द

१. खर्चात कपात
६. पुष्कट
९. पोटापुरता शिधा
११. प्रमाणपत्र
१२. विश्रांती
१४. गणगोत
१६. तात्काळ
१८. आपला देश
१९. मोठी चूल
२०. चोरी करणारा
२२. झाडलोट
२४. वाढलेला व्याप
२५. जरतारीचा मोर यावर नाचतो
२७. प्रयत्न
२८. घाव, प्रहार
२९. रोखलेली नजर
३१. संतोष, आनंद
३४. समुद्रकिनारा
३८. पुरुष
३९. शिव! शिव!
४०. नुसतीच भटकंती
४१. विशेष
४२. अत्यंत यातनामय अवस्था
४५. माळ, सर
४६. हात
४८. पर्जन्य
४९. फोडातील द्रव
५०. गप्पांची जागा
५२. वक्र
५३. पूर्ण भेदून जाणारे
५४. शरीर
५५. अरण्य, जंगल
५६. तीव्र, अत्यंत टोकदार
५७. दिवस
५९. अर्धांगवायू
६१. चर्चा
६३. कावळा
६४. थोडेसुद्धा, अल्पप्रमाण
६५. टोळीचा प्रमुख
६७. खिडकी
६९. मच्छर
७१. तातडीचे संदेशवहन करण्याचा नामशेष झालेला प्रकार
७३. हनुमान (ग्रा.)
७५. प्रेम, ममता
७७. हमाल
८१. सूर्याचे एक नाव
८२. ठोक, हाण!
८३. युक्ती
८४. नेता, पुढारी

### उभे शब्द

१. कपडालत्ता
२. टिंगल, टवाळी
३. केव्हा (ग्रा.)
४. शाश्वत, चिरंतन
५. सोन्या-चांदीचा व्यापारी
७. महाशिवरात्रीचा मराठी महिना
८. परस्पर
९. पुन्हा पुन्हा
१०. प्रगती, उन्नत
१२. विमान
१३. कच्चे राहिल्यास निरूपयोगी मृत्तिकापात्र
१५. निवासस्थान
१७. आत-बाहेर करण्याची चौकट
२१. दात
२३. वंशपरंपरागत अधिकार
२६. फळातील द्रव
२७. सामान्य
३०. तापापूर्वीचे शहारे
३२. माणूसकी
३३. धैर्य, हिंमतीचे काम
३५. मगज
३६. कडक, न दबणारे
३७. साहित्यातील नऊ भावना
४१. मीठाची चव
४२. नाकी दम आणणारा आकडा
४३. भरपूर रस असलेला
४४. वेडावाकडा
४५. परिस्थिती
४६. पळसाचा डिंक
४७. जन्म-मृत्यू
४८. मोदकाचे आच्छादान
५०. पत्र
५१. अभिप्राय
५३. नाविकदल
५५. मध्यरात्रीचा पाऊस
५८. विरोध, द्वेष
६०. आठवाड्याचा दिवस
६२. चिकटून, जवळ
६६. अति तीव्र, जाळणारे
६८. माफी, दया
७०. दाताखालचा, मदतनीस
७२. महान
७४. कैकयीची दासी
७६. वेदना
७७. वजन
७८. सुंदर तरुणी, पत्नी
७९. शंकर
८०. शेवट

### आडवे उत्तर

१.काटकसर ६.अमाप ९.पसाभार ११.परवाना १२.आराम १४.घरदार १६.तडकाफडकी १८.भारत १९.भट्टी २०.चोर २२.कोवारे २४.पसारा २५.पदर २७.सायास २८.वार २९.टक ३१.समाधान ३४.सागरतट ३८.नर ३९.हरहर ४०.वणवण ४१.खास ४२.नरकवास ४५.हार ४६.कर ४८.पाऊस ४९.लस ५०.टमटमनगरी ५२.वाकडा ५३.आरपार ५४.तन ५५.रान ५६.तीक्ष्ण ५७.वासर ५९.लकवा ६१.मसलत ६३.काक ६४.लवमात्र ६५.सरदार ६७.गवाक्ष ६९.डास ७१.तार ७३.हणमंत ७५.माया ७७.भारवाहक ८१.प्रभाकर ८२.मार ८३.करामत ८४.नायक

### उभे उत्तर

१.कापडचोपड २.टर ३.कवा ४.सनातन ५.सराफ ७.माघ ८.परभारे ९.परतपरत १०.भरभराट १२.आकाशयान १३.मडके १५.दार १७.कीरवा २१.रद २३.वारसाहक्क २६.रस २७.साधारण ३०.कसकस ३२.मानवता ३३.साहस ३५.गर ३६.टणक ३७.नवरस ४१.खारट ४२.नऊ ४३.रस-वान ४४.वाकडातिकडा ४५.हालह-वाल ४६.कमरकस ४७.जननमरण ४८.पारी ५०.टपाल ५१.मत ५३.आरमार ५५.रातवा ५८.सवतासुभा ६०.वार ६२.लगत ६६.दाहक ६८.क्षमा ७०.सहाय्यक ७२.थोर ७४.मंथरा ७६.यातना ७७.भार ७८.वामा ७९.हर ८०.अंत



# क्रीडा विश्व

## थोडक्यात/ संक्षिप्त

### अभिषेक दुसऱ्यांसोबत करतो तेच त्याच्यासोबत झाले, सरफराजने एका ओव्हरमध्येच तारे दाखवले!

जयपूर-विजय हजारे ट्रॉफीमध्ये टीम इंडियात कमबॅक करण्याचा प्रयत्न करणारे सगळे खेळाडू धमाका करत आहेत. मुंबईचा सरफराज खानही त्यातलाच एक आहे. २०२४ साली भारताकडून शेवटची मॅच खेळलेल्या सरफराज खानची बॅट पुन्हा एकदा तळपली आहे. ८ जानेवारीला पंजाबविरुद्धच्या सामन्यात सरफराज खानने २० बॉलमध्ये ६२ रनची वादळी खेळी केली.

विजय हजारे ट्रॉफीमध्ये सरफराजची कामगिरी
पंजाबविरुद्ध- २० बॉलमध्ये ६२ रन
हिमाचल प्रदेशविरुद्ध- १० बॉलमध्ये २१ रन
गोव्याविरुद्ध- ७५ बॉलमध्ये १५७ रन
छत्तीसगडविरुद्ध- बॅटिंगची संधी नाही
उत्तराखंडविरुद्ध- ४९ बॉलमध्ये ५५ रन
सिक्कीमविरुद्ध- ५ बॉलमध्ये ८ रन

सरफराज खानने पंजाबविरुद्ध ३१० च्या स्ट्राईक रेटने बॅटिंग करत ७ फोर आणि ६ सिक्स मारले. सरफराजने त्याच्या या खेळीमध्ये अभिषेक शर्माच्या एका ओव्हरमध्ये ३० रन ठोकल्या. टीम इंडियाचा विस्फोटक बॅटर असलेला अभिषेक शर्मा डावखुरी स्पिन बॉलिंगही करतो. सरफराजने अभिषेकच्या ओव्हरमध्ये ६, ४, ६, ४, ६, ४ अशा रन काढल्या. मुंबईचा २६.२ ओव्हरमध्ये २१५ रनवर ऑलआऊट झाला त्यामुळे त्यांना १ रनने पराभव पत्करावा लागला.

### दक्षिण आफ्रिकेवर तिसऱ्या वनडे दणदणीत विजय, ३-० सुपडा साफ करत मालिका जिंकली

नवी दिल्ली-भारत आणि दक्षिण आफ्रिकेच्या अंडर १९ संघांमध्ये तीन सामन्यांची एकदिवसीय मालिका पार पडली. या मालिकेत भारतानं वैभव सूर्यवंशीच्या नेतृत्त्वात दक्षिण आफ्रिकेला ३-० नं पराभूत केलं आहे. भारतानं तिसऱ्या वनडेत दक्षिण आफ्रिकेवर २३३ धावांनी विजय मिळवला. तिसऱ्या वनडेत भारतानं प्रथम फलंदाजी करत ३९३ धावा केल्या होत्या. भारतासाठी वैभव सूर्यवंशी आणि आरोन जॉर्ज या दोघांनी शतकं केली. मोठ्या धावसंख्येचा पाठलाग करताना दक्षिण आफ्रिकेचा संघ १६० धावांवर गारद झाला. दक्षिण आफ्रिकेनं टॉस जिंकून भारताला प्रथम फलंदाजीसाठी पाचारण केलं होतं. भारताचे सलामीवीर वैभव सूर्यवंशी आणि आरोन जॉर्ज या दोघांनी २२७ धावांची भागीदारी केली. वैभव सूर्यवंशीनं ६३ बॉलमध्ये शतक पूर्ण केलं. वैभव सूर्यवंशीलचं लिस्ट ए करिअरमधील दुसरं शतक ठरलं. या डावात त्यानं ७४ बॉलवर १२७ धावा केल्या. यामध्ये त्यानं ९ चौकार आणि १० षटकार मारले. याशिवाय आरोन जॉर्ज यानं १०६ बॉलमध्ये ११८ धावा केल्या. सूर्यवंशी आणि जॉर्ज या दोघांनी २२७ धावांची भागीदारी केली. भारताची पहिली विकेट २५.४ ओव्हरमध्ये गेली. आता अंडर १९ वनडे वर्ल्ड कप १५ जानेवारीपासून दक्षिण आफ्रिकेत सुरु होणार आहे.

### राज्य क्रीडा दिनानिमित्त विविध उपक्रमांचे आयोजन करण्याचे आवाहन

मुंबई-ऑलिम्पिकवीर खाशाबा जाधव यांचा जन्मदिन १५ जानेवारी राज्य क्रीडा दिन म्हणून साजरा करण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे. या अनुषंगाने १२ ते १५ जानेवारी २०२६ या कालावधीत राज्यातील शाळा व महाविद्यालयांमध्ये विविध क्रीडाविषयक उपक्रमांचे आयोजन करण्याचे आवाहन क्रीडा विभागातर्फे करण्यात आले आहे.

ऑलिम्पिकवीर खाशाबा जाधव यांच्या उल्लेखनीय कामगिरीचा गौरव करणे तसेच नवोदित खेळाडूंना दर्जेदार कामगिरी करण्यासाठी प्रेरणा व प्रोत्साहन देणे, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. याअंतर्गत मुंबई उपनगर जिल्ह्यात १२ ते १५ जानेवारी २०२६ या कालावधीत शाळा व महाविद्यालयांमध्ये पुढील उपक्रमांचे आयोजन करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.या उपक्रमांतर्गत ऑलिम्पिकवीर खाशाबा जाधव यांची जीवनगाथा व क्रीडा क्षेत्रातील त्यांचे योगदान याविषयी व्याख्याने, या ई-मेल आयडीवर पाठविण्यात यावा.

उत्कृष्ट नियोजन व प्रभावी अंमलबजावणी करणाऱ्या प्रथम तीन क्रमांकांच्या संस्थांना अनुक्रमे १०,०००, ७,००० व ५,००० रोख पारितोषिक, गौरवपत्र व सन्मानचिन्ह देऊन सन्मानित करण्यात येणार आहे, असे आवाहन मुंबई उपनगरच्या जिल्हा क्रीडा

## इंग्लंडच्या जेकब बेथेलचे दमदार शतक



सिडनी : क्रिकेट ग्राउंड येथे ऑस्ट्रेलिया विरुद्ध इंग्लंड यांच्यातील प्रतिष्ठित अॅशेस मालिकेतील पाचवा आणि अखेरचा कसोटी सामना खेळवण्यात येत आहे. चौथ्या दिवसाअखेर इंग्लंडच्या संघाने जेकब बेथेलच्या दमदार शतकाच्या जोरावर ८ बळींच्या मोबदल्यात ३०२ धावा करत ११९ धावांची आघाडी घेतली आहे. खेळ थांबला त्यावेळी जेकब बेथेल १४२ धावांवर नाबाद होता. त्याआधी ऑस्ट्रेलियन संघाने ट्रॅविस हेड १६३ (१६६) आणि स्टीव्ह स्मिथ १३८ (२२०) यांच्या शतकासह तळाच्या फलंदाजीत वेबस्टरनं केलेल्या ८७ चेंडूतील ७१ धावांच्या खेळीसह पहिल्या डावात ५६७ धावांचा डोंगर उभारल्याचे पाहायला मिळाले.

ही मोठी धावसंख्या उभारताना ऑस्ट्रेलियाने खास विक्रम आपल्या नावे केला. आतापर्यंतच्या १३४ वर्षात जे घडलं नाही ते कांगारुंच्या संघाने सिडनी कसोटीतील पहिल्या डावात करुन दाखवल. एवढेच नाही तर त्यांनी टीम इंडियाच्या वर्ल्ड रेकॉर्डची बरोबरी केली आहे. इथं एक नजर टाकुयात त्या खास रेकॉर्डवर ऑस्ट्रेलियाच्या संघाने पहिल्या डावात ७ अर्धशतकी भागीदारीसह खास विक्रम आपल्या नावे केला. याआधी अॅशेस मालिकेच्या इतिहासात एका डावात ६ अर्धशतकी भागीदारीचा रेकॉर्ड होता. इंग्लंडच्या संघाने १८९२ मध्ये अॅडलेड येथे झालेल्या कसोटीत ही कामगिरी करून दाखवली होती. हा विक्रम ऑस्ट्रेलियाने मोडीत काढला आहे. कसोटी क्रिकेटच्या इतिहासात एका डावात ७ अर्धशतकी भागादारीचा अद्भूतपूर्व रेकॉर्ड पहिल्यांदा टीम इंडियाने साध्य केला होता. २००७ मध्ये इंग्लंड विरुद्धच्या ओव्हल कसोटीत भारतीय संघाने ही कामगिरी केली होती. ऑस्ट्रेलियन संघाने टीम इंडियाच्या या वर्ल्ड रेकॉर्डशी बरोबरीचा डाव साधला आहे.

सचिन-जाफर (पहिल्या विकेटसाठी ६२ धावांची भागीदारी)
सचिन- द्रविड (दुसर्या विकेटसाठी १२७ धावांची भागीदारी)
सचिन-गांगुली (चौथ्या विकेटसाठी ७७ धावांची भागीदारी)
सचिन-लक्ष्मण (पाचव्या विकेटसाठी ७८ धावांची भागीदारी)
सचिन-धोनी (सहाव्या विकेटसाठी ६३ धावांची भागीदारी)
धोनी-झहीर (सातव्या विकेटसाठी ९१ धावांची भागीदारी)
आरपी सिंह- श्रीसंत (दहाव्या विकेटसाठी ७३ धावांची भागीदारी)

## दीप्ती शर्मा क्रमवारीत दुसऱ्या स्थानावर

मुंबई : आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेने नव्याने जाहीर केलेल्या महिला क्रिकेटमधील टी-२० क्रमवारीत भारतीय संघाची ऑलराउंडर दीप्ती शर्माला मोठा धक्का बसला आहे. श्रीलंकेविरुद्धच्या टी-२० मालिकेत छोट्या फॉरमॅटमध्ये सर्वाधिक विकेट्स घेण्याचा विक्रम नोंदवणारी दीप्तीची बॉलिंग रँकिंगमध्ये दुसर्या स्थानावर घसरली आहे. ऑस्ट्रेलियन जलदगती गोलंदाज नाबेल सदरलँड हिने पुन्हा एकदा अव्वलस्थानी कब्जा केला आहे. ऑस्ट्रेलियन नाबेल सदरलँड ७३६ रेटिंग पॉइंट्स मिळवत महिला टी-२० क्रमवारीतील बॉलिंग क्रमवारीत अव्वलस्थानी पोहचली आहे. त्यापाठोपाठ दीप्ती शर्मा ७३५ रेटिंग पॉइंट्ससह दुसर्या स्थानावर दिसते. पाकिस्तानची सादिया इक्बाल (७३२ रेटिंग), इंग्लंडची सोफी एक्लेस्टोन (७२७ रेटिंग) आणि लॉरेन बेल (७१४) या अनुक्रमे तिसर्या, चौथ्या आणि पाचव्या स्थानावर आहेत.



ताज्या रँकिंगमध्ये भारताच्या रेणुका सिंग ठाकूरला पाच स्थानांचा फटका बसला असून ती ६९८ रेटिंगसह ११व्या स्थानावर घसरली आहे. याशिवाय राधा यादवलाही दोन स्थानांचं नुकसान झाले असून ती १८ व्या क्रमांकावर आहे. कर्णधार हरमनप्रीत कौरनं श्रीलंकेविरुद्धच्या टी-२० मालिकेतील पाचव्या आणि अखेरच्या सामन्यात अर्धशतक झळकावले होते. या खेळीचा तिला चांगला फायदा झाला असून दोन स्थानांच्या सुधारणेसह भारतीय कर्णधार बॅटरच्या क्रमवारीत १३ व्या स्थानी पोहचली आहे. महिला टी-२० मध्ये ऑलराउंडरच्या क्रमवारीत हेले मॅथ्यूज ५०५ रेटिंगसह अव्वलस्थानी आहे.

न्यूझीलंडची अमेलिया केर ४३४ रेटिंगसह दुसर्या तर दीप्ती शर्मा ३८२ रेटिंगसह तिसर्या स्थानावर आहे. श्रीलंकेविरुद्धच्या मालिकेत अरुंधती रेड्डीने नाबाद २७ धावांच्या खेळीसह एक विकेट घेतली होती. या कामगिरीमुळे ती २१ स्थानांनी मोठी झेप घेत ४४ व्या क्रमांकावर पोहचली आहे. महिला टी-२० क्रमवारीत बॅटरच्या क्रमवारीत कोणताही बदल झालेला नाही. ऑस्ट्रेलियन बेथ मूनी ७९४ रेटिंगसह अव्वलस्थानी असून वेस्ट इंडिजच्या हेली मेथ्यूज (७७४ रेटिंग) पाठोपाठ स्मृती मानधना (७५९ ) तिसर्या स्थानी आहे. आघाडीच्या १० मध्ये स्मृतीसह शेफाली वर्माचाही नंबलागतो. ती ७३२रेटिंगसह सहाव्या क्रमांकावर आहे.

## टी-२० विश्वचषकासाठी मिचेल सँटनर न्यूझीलंडचा कर्णधार

वेलिंगटन : भारत आणि श्रीलंकेत होणार्या टी२० वर्ल्ड कप २०२६ स्पर्धेसाठी न्यूझीलंडने आपल्या १५ सदस्यीय संघाची घोषणा केली आहे. मिचेल सँटनरकडे संघाच्या नेतृत्वाची जबाबदारी सोपवण्यात आली आहे. न्यूझीलंडचा संघ वर्ल्ड कप स्पर्धेतील बहुतांश सामने चेन्नईतील चेपॉकच्या मैदानात खेळणार आहे. याच पार्श्वभूमीवर संघ बांधणी करताना फिरकीवर भर देण्याची रणनिती न्यूझीलंडच्या संघाने आखली आहे. न्यूझीलंडच्या संघात जलदगती गोलंदाज जेकब डफी याला देखील स्थान मिळाले आहे. मागील वर्षातील उत्कृष्ट कामगिरीच्या जोरावर त्याने आपली जागा निश्चित केली आहे. तो पहिल्यांदा टी-२० वर्ल्ड कप खेळताना दिसेल. डफीने गतवर्षी आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये पदार्पण केलं होतं, मात्र अल्पावधीतच आपल्या प्रभावी गोलंदाजीने सर्वांचं लक्ष वेधून घेतलं आहे. सातत्यपूर्ण आपल्या गोलंदाजीतील धार दाखवत त्याने वर्ल्ड कप संघात स्थान मिळवले आहे. टी २० वर्ल्ड कपसाठी न्यूझीलंडच्या संघात वर्णी लागलेल्या या गोलंदाजावर खझङलिलावात ठउइ च्या संघाने २ कोटी बोली लावली होती. ३१ वर्षीय गोलंदाजाने ३६ सामन्यात सर्व प्रकारात मिळून ८१ बळी टिपले आहेत. गतवर्षी डफीनं एका वर्षात सर्वाधिक विकेट्स घेण्याचा सर रिचर्ड हेडली या दिग्गजाचा ४० वर्षापूर्वीचा विक्रम मोडला होता. आयसीसी टी २० क्रमवारीतल डफी दुसर्या स्थानावर आहे.

## कर्णधार वैभव सूर्यवंशीचा सुपर शो!

दिल्ली-दक्षिण आफ्रिकेविरुद्ध वैभव सूर्यवंशीने धडाकेबाज कामगिरी करत सर्वांचे लक्ष वेधून घेतले. २०२६ च्या अंडर-१९ विश्वचषकापूर्वी त्याने केलेली ही कामगिरी भारतीय क्रिकेटसाठी अत्यंत महत्त्वाची मानली जात आहे. दक्षिण आफ्रिका दौऱ्यावर झालेल्या अंडर-१९ यूथ वनडे मालिकेत वैभवने अवघ्या तीन डावांत २०६ धावा ठोकल्या. विशेष म्हणजे, कर्णधार म्हणून मैदानात पहिल्यांदाच उतरून त्याने भारताला ३-० असा मालिका विजय मिळवून दिला आणि प्लेयर ऑफ द सीरिज हा मानही पटकावला. त्यामुळे आता एकच प्रश्न चर्चेत आहे, वैभवची कर्णधारपदाची धुरा कायम ठेवावी का?

आयुष म्हात्रेच्या अनुपस्थितीत वैभव सूर्यवंशीकडे भारतीय अंडर-१९ संघाची कमान सोपवण्यात आली होती. पहिल्या सामन्यात तो केवळ ११ धावांवर बाद झाला आणि निराशा झाली, तरीसुद्धा त्याच्या नेतृत्वाखाली भारताने सामना जिंकला. दुसऱ्या वनडेमध्ये वैभवने अवघ्या २४ चेंडूमध्ये आक्रमक ६८ धावा ठोकत आपली गुणवत्ता सिद्ध केली. त्यानंतर तिसऱ्या सामन्यात ७४ चेंडूमध्ये झंझावाती १२७ धावा करत त्याने भारताच्या



विजयावर शिक्कामोर्तब केले.

आयुषच्या जागी वैभव?

अंडर-१९ विश्वचषकाच्या तोंडावर वैभवची ही कामगिरी टीम इंडियासाठी मोठी दिलासादायक ठरली आहे. सर्वात महत्त्वाची बाब म्हणजे कर्णधारपदाची जबाबदारी असतानाही त्याच्या फलंदाजीवर कोणताही परिणाम झाला नाही. दुसरीकडे, मागील काही स्पर्धांमध्ये अंडर-१९ आशिया कप तसेच इंग्लंड आणि ऑस्ट्रेलिया दौऱ्यातील यूथ वनडे मालिकेत आयुष म्हात्रेची कामगिरी फारशी समाधानकारक नव्हती. अंडर-१९ आशिया कपमध्ये आयुषने पाच डावांत अनुक्रमे ४, ३८, १४, ७ आणि २ धावा केल्या होत्या. पाचही सामने अपयशी ठरल्यानंतर त्याच्याकडून कर्णधारपद काढून घेण्याची मागणीही होऊ लागली होती. तरीसुद्धा, अंडर-१९ विश्वचषकासाठी जाहीर झालेल्या संघात आयुषलाच कर्णधारपद देण्यात आले आहे. सध्याच्या दक्षिण आफ्रिका मालिकेत तो पूर्णपणे तंदुरुस्त नसल्यामुळे बाहेर होता.

आता वैभवने दाखवलेली जबरदस्त कामगिरी आयुषवर दबाव वाढवणारी ठरू शकते. जर आयुष अंडर-१९ विश्वचषकात कर्णधार म्हणून खेळताना अपेक्षित सुधारणा दाखवू शकला नाही, तर स्पर्धेनंतर वैभव सूर्यवंशीकडे भारतीय अंडर-१९ संघाचे कर्णधारपद सोपवले जाऊ शकते.

सध्या दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या मालिकेत वैभवकडे कर्णधारपद देण्याचे कारण म्हणजे आयुष म्हात्रे आणि उपकर्णधार विहान मल्होत्रा हे दोघेही पूर्णपणे तंदुरुस्त नव्हते. मात्र विश्वचषकाच्या संघात दोघांचाही समावेश आहे. जर हे दोघेही वेळेत फिट होऊ शकले नाहीत, तर अंडर-१९ विश्वचषकात वैभव सूर्यवंशीच भारतीय संघाचे नेतृत्व

## १५ धावात ५ विकेट,बुलेट ट्रेनच्या स्पीडने मुंबईचे विकेट पडले



विजयासाठी एक रनही काढता आला नाही

दिल्ली-भारत आणि न्यूझीलंड यांच्यातील मालिकेआधी टीम इंडियाचे अनेक स्टार खेळाडू विजय हजारे ट्रॉफी स्पर्धेत घाम घालताना दिसत आहेत. त्यात आजच्या सामन्यात मुंबईचा पंजाबने धुव्वा उडवला होता. मुंबईकडे टीम इंडियातील स्टार खेळाडूंचा भरणा असून देखील त्यांचे बुलेटच्या स्पीडने १५ धावात ५ विकेट पडले. शेवटी मुंबईला एक धाव हवी होती, ही धाव काढता न आल्याने पंजाबने मुंबईचा एका धावाने पराभव केला आहे.

खरे तर मुंबईसमोर २१६ धावांचे लक्ष्य होते. या लक्ष्याचा पाठलाग करण्यासाठी मुंबईकडून अंगक्रिश रघुवंशी आणि मुशीर खान मैदानात उतरले होते. पण अंगक्रिश २३ तर मुशीर खान २१ वर बाद झाला होता. त्यानंतर मैदानात सरफराज खान आणि श्रेयस अय्यरची एंन्ट्री झाली होती. या दोघांनी मुंबईचा डाव सावरला होता.

सरफराज खानने मैदानात येताच पहिल्याच बॉल पासून प्रहार करायला सूरूवात केली होती. त्यामुळे त्याने अवघ्या २० बॉवमध्ये ६२ धावा कुटल्या होत्या. या खेळी दरम्यान त्याने ५ षटकार आणि ७ चौकार लगावले होते. या दरम्यान त्याचा स्ट्राईक रेट हा ३१० च्या आसपास होता.

सरफराज बाद झाल्यानंतर सुर्यकुमार यादवची मैदानात एंन्ट्री झाली होती. मात्र तो फार काळ टीकला नाही आणि १५ धावांवर बाद झाला.त्याच्यापाठोपाठ शिवम दुबे देखील १२ धावांवर बाद झाला.यानंतर कर्णधार श्रेयस अय्यरने ३४ बॉलमध्ये ४५ धावा करून बाद झाला.

श्रेयस अय्यर जेव्हा बाद झाला तेव्हा मुंबईची धावसंख्या २०१ वर ६ विकेट अशी होती. यावेळी मुंबईला विजयासाठी अवघ्या १५ धावा हव्या होत्या. या १५ धावा ४ खेळाडूंना मिळून काढायच्या होत्या. पण पंजाबच्या गोलंदाजांनी भेदक गोलंदाजी करून मुंबईला विजयासाठी १ धावा हवी असताना अख्खा संघ तंबुत परतवला होता. श्रेयस अय्यरसह हार्दिक तामोर १५,साईराज पाटील २, शशांत आतर्डे आणि ओमकार तारमले एकही धाव न काढला बाद झाले होते.त्यामुळे मुंबईचा डाव हा २६.२ ओव्हरमध्ये २१५ धावांवर ऑल आऊट झाला. पंजाबकडून गुरनुर ब्रार आणि मयंक मार्कंडेयने प्रत्येकी ४ विकेट घेतले होते. त्यासोबत हरप्रीत ब्रार आणि हरनुर सिंहने प्रत्येकी १ विकेट घेतली होती. दरम्यान याआधी पंजाब प्रथम फलंदाजी करताना २१६ धावांवर ऑलआऊट झाला होता. पंजाबकडून रमणदिप सिंहने ७२ धावांची सर्वाधिक खेळी केली होती.आणि अनमोल प्रितसिंहने ५७ धावांची खेळी केली होती. त्यामुळे पंजाबने २१६ धावा केल्या होत्या. मुंबईकडून मुशीर खाने तीन, तर ओमकार तारमले, शिवम दुबे आणि शशांक आतर्डे यांनी प्रत्येकी २ विकेट घेतल्या होत्या आणि साईराज पाटीलने १ विकेट घेतली होती.

## नाईट क्लबमध्ये हाणामारी! अशेश पराभवानंतर इंग्लंडने हंटर चालवला

मुंबई-ऍशेस २०२५-२६ मध्ये इंग्लंडचा ऑस्ट्रेलियाने ४-१ ने धुव्वा उडवला आहे. ऍशेसमधल्या या कामगिरीनंतर इंग्लंड क्रिकेट बोर्डाने कारवाईचा बडगा उगारला आहे. इंग्लंडचा स्टार खेळाडू हॅरी ब्रुक याची ऍशेसमधली कामगिरी निराशाजनक झाली. ऍशेसमधील शॉट सिलेक्शन आणि सामन्याच्या परिस्थितीनुसार खेळण्याची अक्षमता यामुळे ब्रुकवर टीकेची झोड उठली आहे. मैदानावरील अपयशानंतर आता हॅरी ब्रुक मैदानाबाहेरच्या त्याच्या वादामुळेही अडचणीत आला आहे. इंग्लंड ऍन्ड वेल्स क्रिकेट बोर्डाने ब्रुकवर ३० हजार पाऊंड म्हणजेच ३६ लाख रुपयांचा दंड ठोठावला आहे.

१ नोव्हेंबर रोजी वेलिंग्टनमध्ये न्यूझीलंडविरुद्धच्या सामन्याच्या आदल्या रात्री इंग्लंडच्या व्हाईट बॉल टीमचा कर्णधार हॅरी ब्रुक वादात सापडला होता. ज्यात नाईट क्लबमध्ये एका बाऊन्सरसोबत त्याची हाणामारी झाली होती. इंग्लंडच्या ऍशेस सीरिजआधी तीन आठवड्यांपूर्वीच हा राडा झाला होता. त्यानंतरच्या न्यूझीलंडविरुद्धच्या सामन्यात ब्रुक फक्त ६ रन



दिग्गज खेळाडूला ३६ लाखांचा दंड

करू शकला आणि इंग्लंडने सामना गमावला. ही सीरिज इंग्लंडने ३-० ने गमावली. ऍशेसमध्ये इंग्लंडचा ऑस्ट्रेलियाविरुद्ध ४-१ ने दारूण पराभव झाला, त्यानंतर ब्रुकचा न्यूझीलंडमधला वाद समोर आला. यानंतर आता ब्रुकने माफी मागितली आहे. ममी माझ्या वर्तनाबद्दल माफी मागतो आणि माझे वर्तन अयोग्य होते आणि माझ्यासाठी आणि इंग्लंड टीमसाठी लाजिरवाणे होते, हे मी पूर्णपणे मान्य करतो. इंग्लंडचे प्रतिनिधित्व करणे हा एक सर्वोच्च सन्मान आहे, जो मी खूप गांभीर्याने घेतो. माझ्या टीममधील खेळाडू, प्रशिक्षक आणि समर्थकांना निराश केल्याबद्दल मी मनापासून माफी मागतो. या घटनेतून शिकलेल्या धड्यांवर, विशेषत: जबाबदारी, व्यावसायिकता आणि आपल्या देशाचे प्रतिनिधित्व करणाऱ्यांकडून अपेक्षित असलेल्या मानकांबद्दल मी मनापासून विचार केला आहे. या चुकीतून शिकण्याचा आणि मैदानावर आणि बाहेर माझ्या भविष्यातील कृतींद्वारे विश्वास पुन्हा निर्माण करण्याचा मी निश्चय करतो. मी नि:संशयपणे माफी मागतो आणि हे पुन्हा घडू नये यासाठी कठोर परिश्रम करेनफ, असं ब्रुक त्याच्या निवेदनात म्हणाला.

इंग्लंड क्रिकेट बोर्डाने ब्रुकला दंड ठोठावल्यानंतर त्याच्याशी दीर्घ चर्चा केल्याचा दावा केला. मआम्हाला या घटनेची जाणीव आहे आणि ईसीबीच्या औपचारिक आणि गोपनीय शिस्तपालन प्रक्रियेअंतर्गत त्याच्यावर कारवाई करण्यात आली आहे. संबंधित खेळाडूने माफी मागितली आहे आणि या प्रसंगी त्याचे वर्तन अपेक्षित मानकांपेक्षा कमी असल्याचे मान्य केले आहेफ, असे ईसीबीने एका निवेदनात म्हटले आहे.

# लातूर जिल्ह्याचे सुपुत्र प्रताप वाघमारे यांची वर्धा येथे उपजिल्हाधिकारीपदी पदोन्नती!

**लातूर/प्रतिनिधी :** नागभीड तहसील कार्यालयाचे तहसीलदार प्रताप वाघमारे यांची शासनाने नुकतीच जाहीर केलेल्या पदोन्नती यादीत उपजिल्हाधिकारी या पदावर पदोन्नती करण्यात आली असून त्यांची वर्धा येथे भूसंपादन उपजिल्हाधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. गेल्या सुमारे सतरा वर्षांपासून ते विदर्भात प्रशासकीय सेवेत कार्यरत आहेत.

प्रामाणिक, लोकाभिमुख व पारदर्शक कार्यशैलीमुळे त्यांनी विदर्भात अल्पावधीतच आपली वेगळी ओळख निर्माण केली. सर्वसामान्य नागरिकांशी सुसंवाद, तक्रारींवर तत्काळ निर्णय व प्रशासकीय कामकाजात गतिमानता या गुणांमुळे ते लोकप्रिय अधिकारी म्हणून ओळखले जातात.

नुकत्याच महाराष्ट्र शासनाच्या १०० दिवस कार्यक्रमात नागभीड तालुका अग्रेसर राहिल्यामुळे त्यांच्या तहसील कार्यालयास शसनाने गौरवले आहे.

मुख्यमंत्री १०० दिवस कार्यक्रमा अंतर्गत राबविण्यात आलेल्या विविध उपक्रमांत नागपूर विभागातून नागभीड तालुक्याचे नाव अग्रेसर आणण्यात त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. या उल्लेखनीय कामगिरीची दखल



घेत महाराष्ट्र शासनाने २०२५ मध्ये 'उत्कृष्ट तहसीलदार' पुरस्काराने त्यांना सन्मानित केले आहे.

प्रशासकीय सेवेचा भक्कम प्रवास आहे. त्यांचे मूळ गाव आलमला, जन्मगाव बुधोडा असलेल्या प्रताप वाघमारे यांनी प्राथमिक शिक्षण जि. प. शाळा, बुधोडा, येथे घेतले तर माध्यमिक शिक्षण केशवराज विद्यालय, लातूर, येथे पूर्ण केले. अकरावी ते कला पदवीचे शिक्षण राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर येथे पूर्ण केले.

तर पदव्युत्तर शिक्षण दयानंद महाविद्यालय, लातूर येथून लोकप्रशासन () पूर्ण केले आहे. लातूर हे शिक्षणाचे केंद्र मानले जाते पण ज्या काळात नुकतीच स्पर्धा परीक्षा विषयी जागृती होत होती त्या वेळी २००७ साली त्यांनी प्रशासकीय सेवेत प्रवेश करून गोंदिया जिल्ह्यात नक्षलग्रस्त भागात नायब तहसीलदार म्हणून आपल्या प्रशासकीय कारकिर्दीची सुरुवात केली. आदिवासीबहुल भागात सुगम प्रशासन राबवत पोलीस प्रशासनासोबत 'सामाजिक सह्याचे प्रशासन' या संकल्पनेतून त्यांनी तत्कालीन प्रशासकीय वरिष्ठाच्या सह्याने नागरिकांना विविध सुविधा उपलब्ध करून दिल्या. आदिवासी व वनाधारित उपक्रमांची उल्लेखनीय कामगिरी केली

वनहक्क कायद्यांतर्गत १०० टक्के गावांचे सामूहिक वनहक्क मंजूर करणारा देशातील पहिला तालुका घडवून आणण्याचे श्रेय त्यांना दिले जाते. तसेच,तेंदूपत्ता संकलन व विक्रीचा अधिकार गावकऱ्यांना मिळवून देणे, ४ हजार महिलांना व युवकांना जंगलातील पानांपासून खतनिर्मितीस प्रोत्साहन देत निसर्गाधारित रोजगारनिर्मिती, रुग्णांना सामाजिक अर्थसहाय्य योजनेत समाविष्ट करण्याचा प्रस्ताव, असे अनेक उपक्रम त्यांनी यशस्वीपणे राबविले. प्रशासकीय कारकिर्दीत विविध तालुक्यांत उल्लेखनीय सेवा केल्या आहेत. त्यात त्यांनी नागपूर जिल्ह्यातील कुही तालुक्यात गोसेखुर्द प्रकल्पग्रस्त ३३ गावांचे पुनर्वसन, ग्रामपंचायत निवडणुका, हिंगणा तालुक्यात समृद्धी महामार्गासाठी पहिली जमीन खरेदी, कोरोना काळात विभागीय आयुक्त कार्यालयात उत्कृष्ट महसूल सेवा, सावनेर तालुक्यात अवैध गवठा खनिज प्रतिबंध व 'वुमन अँड चाईल्ड फ्रेंडली ऑफिस' संकल्पना, तर नागपूर ग्रामीण तहसीलदार म्हणून अधिवेशन काळात राष्ट्रपती, उपराष्ट्रपती, पंतप्रधान व राज्यपाल यांच्या राज्य शिष्टाचार कामकाजात सहभाग,



निवडणुकांमध्ये –, यांसारख्या नाविन्यपूर्ण संकल्पना त्यांनी यशस्वीपणे राबवल्या आहेत. त्यांच्या प्रशासकीय कामासाठी विविध पुरस्कार प्राप्त झाले आहेत. तर त्यांचा लेखण क्षेत्रात लेखक व कवी म्हणून वावर राहिला आहे.

'सांजार्त' या कवितासंग्रहाचे लेखक असून या संग्रहास १३ पारितोषिके मिळाली आहेत. विविध वर्तमानपत्रांत स्तंभलेखन, स्पर्धा परीक्षार्थींना मार्गदर्शन, तसेच वनामी प्रशिक्षण संस्थेत वर्ग–दोन अधिकाऱ्यांना प्रशिक्षक म्हणून नियमित मार्गदर्शन करत आहेत. आतापर्यंत प्रशासकीय सेवेत २६ पारितोषिके त्यांनी प्राप्त केली आहेत. शासनाच्या नव्या नियुक्तीनुसार ते वर्धा येथे भुससंपादन विभागाला उपजिल्हाधिकारी येथे रुजू झालेले आहेत. लातूर जिल्ह्याचे सुपुत्र म्हणून त्यांच्या यशाबद्दल स्तारातून कौतुक होत आहे. तसेच आपल्या भागातील एका प्रशासकीय सेवेतील अधिकाऱ्याचे यश पाहून गावातील नागरिकांनी फटाके वाजवून व पेढे वाटून गावकऱ्यांच्या वतीने जल्लोष केला आहे. त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन व कौतुक होत आहे पुढील प्रशासकीय वाटचालीस सर्वांनी मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या आहेत.

## दयानंद विज्ञान महाविद्यालयाच्या वतीने क्रिकेट सराव शिबिराचे आयोजन



**लातूर/प्रतिनिधी :** स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,नांदेड व दयानंद विज्ञान महाविद्यालयाच्या वतीने पश्चिम विभाग आंतरविद्यापीठ स्पर्धेकरिता निवडण्यात आलेल्या मुलींच्या क्रिकेट संघाचे शिबिर दि.०५ जानेवारी ते १० जानेवारी २०२६ या कालावधीमध्ये आयोजित करण्यात आलेले आहे.या शिबिरामध्ये विद्यापीठांतर्गत असणाऱ्या विविध महाविद्यालयातील विद्यार्थीनींचा समावेश आहे. त्यात ऐश्वर्या चेवले,संध्या चव्हाण,राधिका शिंदे,मोहिनी खाडप,जानवी वीर, संध्या सुतार,प्रतीक्षा तावसे, ज्ञानेश्वरी हाके,अश्विनी बोरीकर, भाग्यश्री भुसारे,स्वाती कोरडे, गायत्री मुंदडा,वैष्णवी खैरे, ज्योती वाघमारे,साक्षी जाधव, आयुष्का कांबळे यांचा समावेश आहे. सदरील आंतर विद्यापीठ स्पर्धा दिनांक १५ ते २२ जानेवारी २०२६ या कालवधीत बनस्थली विद्यापीठ राजस्थान या ठिकाणी आयोजित करण्यात आली आहे.

सदरील संघास प्रा.ऋषिकेश मस्के हे मार्गदर्शन करीत आहेत तसेच शिबिराचे समन्वयक म्हणून प्रा.डॉ.महेश बेंबडे हे कार्य पाहत आहेत.या शिबिरास दयानंद विज्ञान महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ.सिद्धेश्वर बेल्लाळे,दयानंद शिक्षण संस्थेच्या क्रीडा समितीचे सदस्य रविंद्रजी व्होरा,डॉ. नितेश स्वामी,प्रा.कल्पना टपेकर आदींनी भेट देऊन संघास पुढील स्पर्धेकरिता शुभेच्छा दिल्या.

## सेवा निवृत्त अधिकाऱ्यांच्या पुढाकारातून 'शिवनेरी सिनिअर व्हॉलीबॉल क्लब'ची स्थापना

**लातूर/प्रतिनिधी :** तेरणा शासकीय वसाहत येथील जलसंपदा विभागाच्या मैदानाचे नूतनीकरण करून सेवानिवृत्त उपअभियंता नितीन बी. पाटील व योगीराज माने यांच्या पुढाकारातून शिवनेरी सिनिअर, व्हॉलीबॉल क्लबची स्थापना करण्यात आली आहे. या उपक्रमामुळे ज्येष्ठ नागरिकांमध्ये क्रीडासंस्कृती, शिस्त व आरोग्याबाबत नवा आदर्श निर्माण होत आहे.

या क्लबच्या माध्यमातून कृषी विभागाचे सुरेश कोकाटे, वाय. डी. भोसले, नानासाहेब पाटील, रोहिले नाना, अंकुशे सर यांच्यासह अनेक सेवा निवृत्त व कार्यरत अधिकारी एकत्र येत दररोज सकाळी ८ ते १० : ०० वाजण्याच्या वेळेत उत्साहात व खेळाडूवृत्तीने व्हॉलीबॉल खेळत आहेत. या खेळामुळे शासकीय वसाहतीतील वातावरण खेळीमेळीचे झाले असून, जलसंपदा विभागातील तरुण कर्मचारीही नियमित सरावासाठी मैदानावर येत आहेत.मैदानाच्या परिसरात वृक्षलागवड व संवर्धनाचे कामही खेळाडूंकडून केले जात असून, क्रीडासोबत पर्यावरण जपण्याचा संदेश समाजात दिला जात आहे. या क्लबमध्ये सहभागी असलेले बहुतांश खेळाडू ६० वर्षांवरील असूनही त्यांचा खेळाप्रती असलेला उत्साह पाहता निरोगी राहण्याचा मंत्र समाजात रुजावा हाच या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. तसेच नवोदित खेळाडूंना एक व्यासपीठ उपलब्ध करून देण्याचा हेतूही यातून साध्य होत आहे. सर्व खेळाडू शिवनेरी भगव्या रंगाच्या एकसारख्या पोशाखात शिस्तबद्धपणे सहभागी होत असून, छत्रपती शिवाजी महाराजांनी मावळ्यांना दिलेल्या एकतेच्या व समाजोपयोगी कार्याच्या शिकवणीनुसार हे सर्व सदस्य एकत्र येत प्रेरणादायी कार्य करत आहेत.

## आमदार अभिमन्यू पवार यांच्या हस्ते ३ कोटींच्या विकासकामांचे लोकार्पण, ७२ लाखांच्या कामांचे भूमिपूजन

### विकासाचा अनुशेष भरून काढण्याचा प्रामाणिक प्रयत्न – आ अभिमन्यू पवार

**औसा/प्रतिनिधी :** औसा मतदारसंघातील किनीनवरे गावाच्या सर्वांगीण विकासासाठी महत्त्वपूर्ण टप्पा ठरत, आमदार अभिमन्यू पवार यांच्या हस्ते जवळपास ३ कोटी रुपयांच्या विविध विकासकामांचे लोकार्पण तसेच ७२ लाख रुपयांच्या विकासकामांचे भूमिपूजन उत्साहात पार पडले. या विकासकामांमुळे गावातील पायाभूत सुविधा अधिक भक्कम होणार असून नागरिकांच्या दैनंदिन जीवनात मोठी सोय होणार आहे.

यावेळी आमदार अभिमन्यू पवार यांनी किनीनवरे गावास भेट देऊन किनीनवरे मुख्य रस्ता, केंगलवाडी मुख्य रस्ता, केंगलवाडी येथील स्मशानभूमीचे बांधकाम, समाजमंदिर बांधकाम तसेच जिल्हा परिषद शाळेतील स्वच्छतागृह बांधकाम अशा



जवळपास ३ कोटी रुपयांच्या विकासकामांचे लोकार्पण केले. त्याचबरोबर प्राथमिक आरोग्य उपकेंद्राच्या नवीन इमारतीसह सुमारे ७२ लाख रुपयांच्या विकासकामांचे भूमिपूजन करण्यात आले.

या प्रसंगी बोलताना आमदार अभिमन्यू पवार म्हणाले की, "औसा मतदारसंघाचा अनेक वर्षांचा विकासाचा बॅकलॉग भरून काढण्यासाठी सातत्याने प्रयत्न सुरू आहेत. पायाभूत सुविधा बळकट करण्यासोबतच शेतकरी हा विकासाच्या केंद्रस्थानी ठेवून शेतरस्ते, पाणी आणि वीज या मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्यावर भर दिला जात आहे. या माध्यमातून ग्रामीण भागातील नागरिकांचे जीवनमान उंचावण्याचा आमचा संकल्प आहे."

या कार्यक्रमास संतोष अप्पा मुक्ता, सुभाष जाधव, हनुमंत किनीकर, अॅड. परीक्षित पवार, प्रवीण किनीकर, रेखनाथ देवणीकर, राधाकृष्ण जाधव, आदिनाथ जाधव, प्रतीक पाटील, प्रशांत डोके, राखी निकम,राम बिराजदार, सतीश मझेर, बंकर पाटील, एकनाथ शिंदे, सचिन अनसरवाडे, शंभूराज भोसले, महादेव जाधव, बंटी पाटील. स्थानिक ग्रामस्थ, पदाधिकारी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. किनीनवरे गावात झालेल्या या विकासकामांमुळे परिसराच्या सर्वांगीण प्रगतीला नवी दिशा मिळणार असल्याची भावना यावेळी ग्रामस्थांनी व्यक्त केली.

## डिप्लोमा परिक्षेच्या निकालामध्ये एम एस बिडवे अभियांत्रिकी महाविद्यालयाची भरारी

**लातूर/प्रतिनिधी :** नुकताच महाराष्ट्र राज्य बोर्ड ऑफ टेक्निकल एज्युकेशन यांनी डिप्लोमा हिवाळी परीक्षेचा निकाल जाहीर केला. या निकालामध्ये एम एस बिडवे अभियांत्रिकी महाविद्यालयात मागील वर्षापासून सुरू झालेल्या डिप्लोमा शाखेने उत्कृष्ट निकालाची परंपरा राखली आहे. द्वितीय वर्ष सिविल अभियांत्रिकी मधून कु.ज्योती मंत्री हिने ८७.१८ इतके गुण तर प्रथम वर्षामध्ये कु. पायल श्रेया राजू हिने ८५% इतके गुण मिळवून प्रथम क्रमांक मिळवला.द्वितीय वर्ष संगणक अभियांत्रिकी मध्ये सुनील पाटील याने ८८% इतके गुण मिळवले तसेच प्रथम वर्षात कु. संध्या कांबळे हिने ८७.५० इतके गुण मिळवून प्रथम क्रमांक राखला.

विद्युत अभियांत्रिकी मध्ये कु. अदिबा कासार हिने द्वितीय वर्षात ८८.१२ इतके गुण मिळवले तर प्रथम वर्ष विद्युत अभियांत्रिकी मध्ये वेदांत मुळे याने ८२.१२% इतके गुण मिळवत प्रथम क्रमांक प्राप्त केला.इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन विभागाच्या द्वितीय वर्षांमध्ये कु.ऋतुजा मार्कड हिने ७८.११% इतके गुण मिळवून प्रथम क्रमांक तर प्रथम वर्षामध्ये कु. सायली कवठे हिने ८६ टक्के गुण मिळवत प्रथम क्रमांक पटकावला.माहिती तंत्रज्ञान विभागामध्ये द्वितीय वर्षांमध्ये रियाज गस्ते याने ८३.१८% गुण मिळवून प्रथम क्रमांक तर प्रथम वर्षामध्ये प्रसाद सिंग ठाकूर याने ८७.३०% इतके गुण मिळवत प्रथम क्रमांकाचा मान मिळवला.मेकॅनिकल विभाग द्वितीय वर्षामध्ये कु.शाहूबाई जाधव हिने ८०.५६ टक्के गुण मिळवत प्रथम क्रमांक पटकावला तर प्रथम वर्षामध्ये कु. प्राची पंडिकोंडे हिने ७५ टक्के इतके गुण मिळवत प्रथम क्रमांकावर बाजी मारली. तसेच संपूर्ण महाविद्यालयाचा निकाल हा ८२.२५ टक्के लागला.या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष श्री आदिनाथ सांगवे, उपाध्यक्ष श्री माधवराव पाटील चिंचोलीकर, सचिव श्री माधवराव पाटील टाकळीकर, सहसचिव श्री सुनील मिटकरी, कोषाध्यक्ष श्री विजय रेवडकर, कार्यकारी संचालक श्री प्रदीप दिंडेगावे, संचालक श्री राजेश्वर बुके, श्री बस्वराज एरटे, श्री काशिनाथ साखरे, सौ. ललितताई पांढरे, श्री महेश हलगे, श्री बाबुराव तरगुडे, श्री गुरुलिंग धाराशिवे यांनी सर्व विद्यार्थ्यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले आहे.

## मुक्त विद्यापीठात तीन दिवसीय बहुविद्याशाखीय राष्ट्रीय परिषदेचे उद्घाटन

**नाशिक/प्रतिनिधी :** यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठात 'समावेशक व समताधिष्ठित शिक्षण : नवीन शैक्षणिक धोरण २०२० च्या परिप्रेक्ष्यात वैविध्यपूर्णतेसाठी शिक्षकांची सज्जता' या विषयावरील बहुविद्याशाखीय राष्ट्रीय परिषद तसेच कौन्सिल फॉर टीचर एज्युकेशन फाउंडेशन ( सीटीईएफ) यांच्या ३९ व्या वार्षिक परिषदेचे उद्घाटन दिल्ली येथील राष्ट्रीय शैक्षणिक नियोजन आणि प्रशासन विद्यापीठ यांच्या कुलगुरू प्रा. शशिकला वंजारी यांच्या हस्ते झाले. विद्यापीठाच्या शिक्षणशास्त्र विद्याशाखा व सीटीईएफ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित ही तीन दिवसीय परिषद ८ ते १० जानेवारी २०२६ दरम्यान होत आहे. उद्घाटन कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे मा. कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे होते.

विद्यापीठाच्या शैक्षणिक इमारतीतील सभागृहात आयोजित या कार्यक्रमाच्या व्यासपीठावर डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठ (पिंपरीपुणे) चे कुलगुरू प्रा. एन. जे. पवार, सीटीईएफचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. के. एम. भांडारकर, सीटीईएफच्या आंतरराष्ट्रीय सचिव प्रा. नीलिमा भगवती, विद्यापीठाचे प्र–कुलगुरू डॉ. जोगेंद्रसिंह बिसेन, विद्यापीठ व्यवस्थापन मंडळ



सदस्य तथा शिक्षणशास्त्र विद्याशाखेच्या संचालिका डॉ. संजीवनी महाले तसेच निरंतर शिक्षण विद्याशाखेचे संचालक डॉ. जयदीप निकम यांची प्रमुख उपस्थिती होती.

उद्घाटनपर भाषणात कुलगुरू प्रा. शशिकला वंजारी म्हणाल्या की, विकसित भारत २०४७ चे स्वप्न प्रत्यक्षात उतरवण्यासाठी भारतीय शिक्षणपद्धती ही सर्वसमावेशक, समताधिष्ठित व निरंतर असणे आवश्यक आहे. भारताची सांस्कृतिक परंपरा, गुरुशिष्य परंपरा आणि मूल्याधिष्ठित शिक्षण लक्षात घेऊन शिक्षणव्यवस्था विकसित झाली पाहिजे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० मध्ये यालाच प्राधान्य देण्यात आले आहे. त्यामुळे शिक्षणसंस्थांनी अभ्यासक्रमाची दिशा आणि शिक्षकांची गुणवत्ता यावर विशेष लक्ष देणे गरजेचे आहे. वाढत्या खासगी शिक्षणसंस्थांतील शिक्षक व शिक्षणाची गुणवत्ता तपासली गेली पाहिजे. भविष्यातील दृष्टीने शिक्षक शिक्षणाची सुरुवात नेमकी कुठून करायची, हे ठरवणे अत्यंत महत्त्वाचे आहे, असे त्या म्हणाल्या. मुक्त विद्यापीठ विविध शिक्षणक्रमांद्वारे करत असलेले कार्य विकसित भारत २०४७ चे लघुरूप असल्याचे गौरवोद्गार त्यांनी काढले. सीटीईएफच्या कार्याचाही त्यांनी गौरव केला.

अध्यक्षीय भाषणात कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे यांनी विकसित भारत २०४७ चा विचार करताना देशाच्या विकासासाठी उपलब्ध ज्ञान, साधने आणि परिस्थितीनुसार प्रत्येकाने स्वतःची भूमिका निश्चित करावी, असे आवाहन केले. सीटीईएफचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. के. एम. भांडारकर यांनी भारतीय प्रशासकीय सेवा () प्रमाणे भारतीय शिक्षण सेवा सुरू करावी, तसेच प्राथमिक ते विद्यापीठ स्तरावरील शिक्षकांसाठी राष्ट्रीय पातळीवर स्वतंत्र निधी (फंड) ची कायमस्वरूपी व्यवस्था उभारण्यात यावी, अशी मागणी केली. सीटीईएफच्या आंतरराष्ट्रीय सचिव प्रा. नीलिमा भगवती यांनी संघटनेच्या कार्याची माहिती देताना नेपाळ व भूतानमध्ये संघटनेचे कार्य सुरू असून, आगामी काळात थायलंड व श्रीलंका येथेही कार्य विस्तारण्याचे नियोजन असल्याचे सांगितले. यावेळी उपस्थित मान्यवर यांच्या हस्ते ' दूरस्थ शिक्षण पद्धतीने शिक्षकांचे शिक्षण: मुक्त विद्यापीठाच्या बी. एड. शिक्षणक्रमाचा चिकित्सक अभ्यास' या व परिषदेतील शोधनिबंध सारांश या दोन पुस्तिकांचे प्रकाशन करण्यात आले.

दुपारच्या सत्रात विकसित भारत २०४७ या विषयावर कुलगुरू प्रा. शशिकला वंजारी यांच्या नेतृत्वाखाली परिसंवाद घेण्यात आला. यामध्ये कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे, डॉ. के. एम. भांडारकर, डॉ. गजानन गुल्हाने आणि हिमाचल प्रदेशचे प्रा. मनोज सक्सेना यांनी सहभाग घेत आपले विचार मांडले. दिवसाच्या अंतिम सत्रात सहभागी विद्यार्थ्यांनी आपले शोधनिबंध सादर केले. परिषद समन्वयक डॉ. संजीवनी महाले यांनी प्रास्ताविक केले. श्रीमती शुभांगी पाटील यांनी सूत्रसंचालन केले.

या कार्यक्रमात सीटीईएफतर्फे विद्यापीठाचे मा. कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे यांना 'आयकॉन ऑफ टीचर एज्युकेशन' पुरस्काराने, तर राष्ट्रीय शैक्षणिक नियोजन आणि प्रशासन विद्यापीठ () च्या कुलगुरू प्रा. शशिकला वंजारी यांना 'अवॉर्ड ऑफ एक्सेलेन्स इन टीचर एज्युकेशन' या पुरस्काराने गौरविण्यात आले.

## प्रभाग ६ मधील नागरिकांच्या हृदयात कमळ – गौरव काथवटे

**लातूर/प्रतिनिधी :** प्रभाग क्रमांक ६ हा लातूर शहराचे हृदय म्हणून ओळखला जातो आणि या प्रभागातील प्रत्येक नागरिक व मतदाराच्या हृदयात कमळ आहे. त्यामुळे भाजपाच्या चारही उमेदवारांचा विजय निश्चित आहे, असे प्रतिपादन गौरव काथवटे यांनी केले.



गौरव काथवटे हे भाजपाचे प्रभाग क्रमांक ६ मधील उमेदवार आहेत. त्यांच्यासह गणेश गवारे, सौ.ज्योती आवसकर व मीना गायकवाड हे उमेदवार आहेत.चारही उमेदवार झोकून देऊन प्रचाराच्या कामाला लागले आहेत. सकाळच्या वेळी प्रभागात प्रचारफेरी काढून नागरिकांच्या भेटी घेत आहेत. नागरिकांशी संवाद साधला जात आहे.भाजपाच्या वतीने लातूरच्या विकासासाठी केंद्र आणि राज्य सरकारच्या मदतीने राबविल्या जात असलेल्या योजनांची माहिती नागरिकांना दिली जात आहे.

सायंकाळच्या वेळी प्रभागात कॉर्नर बैठका घेतल्या जात आहेत. या बैठकामध्ये मनोगत व्यक्त करताना गौरव काथवटे बोलत होते. त्यांनी सांगितले की, विकासाची हमी हा भाजपचा शब्द आहे.२०१४ पासून केंद्रात नरेंद्र मोदी आणि राज्यात देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात गतीने विकासकामे केली जात आहेत.विकसित भारताचे स्वप्न साकार करण्यासाठी लातूर शहर आणि शहराला विकसित करण्यासाठी आपल्या प्रभागाचाही विकास होणे आवश्यक आहे. त्यामुळे लातूर महानगरपालिकेत आणि प्रभागातही भाजपाचे उमेदवार विजयी होण्याची गरज आहे. प्रभागातील नागरिकांनी १५ जानेवारी रोजी मतदान करताना भाजपाच्या कमळ या निशाणी समोरील बटन दाबून सर्व उमेदवारांना मताधिक्याने विजयी करावे, असे आवाहनही गौरव काथवटे यांनी केले. गणेश गवारे,सौ ज्योती आवसकर व मीना गायकवाड यांनीही यावेळी मनोगत व्यक्त केले. या बैठकांना प्रभागातील नागरिक, भाजपा पदाधिकारी, कार्यकर्ते आणि मतदारांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

प्रो. जडे यांचे रबरी शिक्के
कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले
टिकाऊ रबरी शिक्के
तयार करून मिळतील.




शाखा १.
जडे–भारत प्रिंटींग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २.
जडेऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्क: (०२३८२) २४२६०८,२४५४०९

# सण-उत्सवात कर्णकर्कश आवाजाला आळा घाला

धाराशिव : (अंजुम शेख)-धाराशिव शहर व जिल्ह्यात सर्व धर्मांचे सण, उत्सव, मिरवणुका तसेच महापुरुषांच्या जयंत्या मोठ्या उत्साहात साजऱ्या केल्या जातात. या सर्व कार्यक्रमांमध्ये डॉल्बी व साऊंड सिस्टीमचा वापर हा सर्वच समाज, मंडळे व संघटनांकडून केला जातो, ही बाब वास्तव आहे. मात्र ठरवलेल्या मर्यादेपेक्षा जास्त आवाजात डॉल्बी वाजवणे हा कायद्याने गुन्हा असून, ध्वनीप्रदूषण नियमांचे उल्लंघन होता कामा नये, अशी ठाम भूमिका नागरिकांतून व्यक्त होत आहे.

डॉल्बीचा वापर स्वतःत गैर नसला तरी वेळेचे पालन न करणे, निश्चित मार्गाबाहेर मिरवणूक काढणे व डेसिबल मर्यादा ओलांडणे चुकीचे ठरते. त्यामुळे डॉल्बी बंदीपेक्षा नियमांचे काटेकोर पालन व प्रभावी नियंत्रण अधिक आवश्यक आहे, असे मत जाणकार नागरिकांनी व्यक्त केले.

प्रत्येक कार्यक्रमासाठी मिरवणुकीचा रूट ठरवणे, वेळापत्रक निश्चित करणे, डेसिबल मर्यादा स्पष्ट करणे आणि त्याची अंमलबजावणी करणे ही प्रशासन व पोलिसांची जबाबदारी आहे. योग्य नियोजन व प्रत्यक्ष नियंत्रण असल्यास नागरिकांना होणारा त्रास टाळता येऊ शकतो.

महत्त्वाचे म्हणजे कायदा सर्वांसाठी समान असावा. कोणत्याही धर्म, जात, संघटना किंवा उत्सवाला अपवाद न ठेवता नियम लागू झाले पाहिजेत. निवडक किंवा पक्षपाती कारवाई केल्यास सामाजिक असंतोष वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही.

जास्त आवाजामुळे ज्येष्ठ नागरिक, लहान मुले, आजारी व्यक्ती यांना त्रास होतो. डॉक्टरांच्या मते, दीर्घकाळ कर्णकर्कश आवाजामुळे कानांवर, हृदयावर व मानसिक आरोग्यावर गंभीर परिणाम होऊ शकतो. त्यामुळे ध्वनीप्रदूषण रोखणे ही केवळ कायदेशीरच नव्हे तर सामाजिक जबाबदारीही आहे.

डॉल्बी व्यवसायावर अनेक कुटुंबांचा उदरनिर्वाह अवलंबून असल्याने बेकायदेशीर आवाजावर कठोर कारवाई, मात्र कायदेशीर व मर्यादित वापराला परवानगी हा समतोल मार्ग असल्याचे नागरिकांचे मत आहे. आयोजक, मंडळे, प्रशासन व पोलिस यांच्यात समन्वय साधून नियमांचे पालन झाले, तर उत्सवही साजरे होतील आणि नागरिकांचे आरोग्यही सुरक्षित राहील, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

# साने गुरुजी ५८वे राष्ट्रीय वार्षिक अधिवेशन बेळगाव

नळदुर्ग (विजय पिसे)- अखिल भारतीय साने गुरुजी कथामालेचे ५८ वे राष्ट्रीय वार्षिक अधिवेशन १०व ११ जानेवारी २०२६ रोजी बेळगाव येथील तुकाराम महाराज सांस्कृतिक भवन ओरिएंटल इंग्लिश स्कूल, विद्या संकुल इंद्रप्रस्थ नगर, टिळकवाडी बेळगाव कर्नाटक येथे थोर शिक्षण तज्ञ श्रीमती सरोज पाटील जागतिक भाषा तज्ञ डॉक्टर गणेश देवी, आय आर. एस. अप्पर आयुक्त बेळगाव आकाश चौगुले यांच्या हस्ते उद्घाटन सोहळा होणार आहे. प्रमुख पाहुणे म्हणून प्राध्यापक शामराव पाटील चेअरमन राजारामबापू बँक सांगली व स्वागताध्यक्ष म्हणून दक्षिण महाराष्ट्र मंडळ बेळगावचे उपाध्यक्ष राजाभाऊ पाटील उपस्थित राहणार आहेत. कार्यक्रमाचे अध्यक्ष माननीय हसन देसाई. व राष्ट्रीय प्रमुख कार्यवाह सुनील पुजारी, कार्याध्यक्ष बाबुराव पाटील, कोषाध्यक्ष गुलाबराव पाटील, मार्गदर्शक लालासाहेब पाटील, ग्रंथालय संघाचे अध्यक्ष डॉक्टर गजानन कोठेवार यांची उपस्थिती अधिवेशनाला राहणार आहे.

तरी बेळगाव येथील अधिवेशनला उपस्थित राहू इच्छिणाऱ्या कथामाला सभासद, साने गुरुजी प्रेमीनी धाराशिव जिल्ह्याचे कार्याध्यक्ष सुनील पुजारी ९४२१०२६२३० त्यांच्याशी संपर्क साधावा असे आवाहन जिल्हा समितीचे अध्यक्ष डॉक्टर गिरीश दत्तात्रय कुलकर्णी यांनी केले आहे.

# दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी दिलासादायक योजना : २०० विद्यार्थ्यांना किसान विकास पत्राचे वाटप

धाराशिव (जिमाका) दि.८ जानेवारी : समाज कल्याण विभाग, जिल्हा परिषद मार्फत राबविण्यात येणाऱ्या पाच टक्के दिव्यांग कल्याण निधीतून वैयक्तिक व सामूहिक योजना राबविण्यात येतात.वैयक्तिक योजनेअंतर्गत सन २०२५-२६ या आर्थिक वर्षामध्ये जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये शिक्षण घेणाऱ्या व जास्त दिव्यांगत्व असणाऱ्या प्रथम २०० विद्यार्थ्यांना प्रति विद्यार्थी २० हजार रुपये प्रमाणे किसान विकास पत्र देण्याची योजना राबविण्यात आली आहे.

या योजनेतून लाभ देण्यात येणाऱ्या प्रथम २०० विद्यार्थ्यांची यादी तसेच ४० लाख रुपयांचा धनादेश २ जानेवारी २०२६ रोजी टपाल खात्याकडे सुपूर्द करण्यात आला आहे.ही योजना कार्यान्वित करण्यासाठी मागील तीन महिन्यांपासून जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार व जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.मैनाक घोष यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यातील दिव्यांग विद्यार्थ्यांच्या पालकांकडून पोस्टाच्या किसान विकास पत्रासाठीचे अर्ज परिपूर्ण करून घेण्याची कार्यवाही सुरू होती.

ही योजना यशस्वी करण्यासाठी जिल्हा समाज कल्याण अधिकारी सचिन कवले,जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी देवदत्त गिरी, शिक्षणाधिकारी श्री.मापारी तसेच वैद्यकीय सामाजिक कार्यकर्ता सच्चिदानंद बांगर यांनी विशेष परिश्रम घेतले.

जिल्ह्यात अशा प्रकारची दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी भरीव योजना प्रथमच राबविण्यात येत असून येत्या आठ दिवसांत किसान विकास पत्र तयार होऊन विद्यार्थ्यांना सुपूर्द करण्यात येतील,असे जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी,जिल्हा परिषद यांनी कळविले आहे.

# लातूर बाजार समितीसह शहराच्या विकासासाठी कटीबध्द

## पालकमंत्री शिवेंद्रसिंह राजे भोसले : बाजार समिती परिसरात बैठक

**लातूर/प्रतिनिधी :** लातूरची बाजार समिती हा राजकारणाचा केंद्रबिंदू आहे. अनेक नेत्यांची कारकीर्द येथून बहरली. परंतु, काँग्रेसने बाजार समितीसह लातूर शहराची दुरावस्था केली. शहरासह बाजार समितीचाही विकास करण्यास भाजपा कटीबध्द आहे. व्यापारी व नागरिकांनी भाजपाच्या पाठीशी उभे रहावे, असे आवाहन जिल्ह्याचे पालकमंत्री शिवेंद्रसिंह राजे भोसले यांनी केले.

लातूर येथील बाजार समिती परिसरात आयोजित बैठकीत पालकमंत्री ना. भोसले बोलत होते. या बैठकीस निवडणुक प्रमुख आ. संभाजी पाटील निलंगेकर, माजी आ. शिवाजीराव पाटील कव्हेकर, डॉ. सौ. अर्चनाताई पाटील चाकूरकर, शहर जिल्हाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर, जितेश चापसी, गुरुनाथ मगे, बाबासाहेब कोरे, नितीन कोरे यांच्यासह उमेदवार गणेशप्पा गवारे, गौरव काथवटे, मिनाताई गायकवाड, ज्योतीताई आवसकर यांची प्रमुख उपस्थिती होती.



यावेळी बोलताना पालकमंत्री म्हणाले की, लातूरच्या बाजार समितीमध्ये मोठा व्यापार होतो. जिल्ह्यासह सीमावर्ती भागातून शेतकरी येतात. याबाबीचा फायदा घेत काँग्रेसने आपली राजकीय दुकानदारी चालवली. परंतु, बाजार समितीवर अवलंबून असणाऱ्या घटकांना सोयी-सुविधा दिल्या नाहीत. या परिसरात मुलभूत सुविधा उपलब्ध नाहीत. बाजार समिती परिसराची दुरावस्था झाली आहे. शहराची अवस्थाही यापेक्षा वेगळी नाही. लातूर महानगरपालिका आर्थिक बाबतीत कमकुवत आहे. त्यामुळे विकास कामांसाठी केंद्र व राज्य सरकारकडून आर्थिक सहाय्य आवश्यक आहे. लातूर महानगरपालिकेत भाजपाची सत्ता आली तर शहराच्या विकासासाठी मोठया प्रमाणात निधी उपलब्ध होणार आहे. राज्याच्या मुख्यमंत्र्यांनी लातूरच्या विकासाचा रोडमॅप तयार केला आहे. फडणवीस यांचे व्हिजन आपण जाणतो. त्यांनी ठरवलेली प्रत्येक गोष्ट पुर्णत्वास जाते. त्यामुळे आपण लातूर महानगरपालिकेत भाजपाला निवडून द्यावे, असे आवाहनही पालकमंत्री भोसले यांनी केले. दिवंगत शिवराज पाटील चाकूरकर यांचे स्मृतीस्थळ उभारण्याची घोषणा मुख्यमंत्र्यांनी बुधवारी झालेल्या सभेत केली. या निमित्त बैठकीत वीरशैव लिंगायत समाजाच्या वतीने सरकारचे प्रतिनिधी म्हणून पालकमंत्र्यांचा सत्कार करण्यात आला. या बैठकीत आपले उमेदवारी अर्ज मागे घेवून भाजपाला सहकार्य केल्याबद्दल दिनकर पाटील व धनंजय हाके यांना पालकमंत्र्यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. या बैठकीस लातूर कृषी उत्पन्न बाजार समितीमधील व्यापारी आणि आडते यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

पालकमंत्री ना. भोसले यांनी अशोक अग्रवाल, बाबासाहेब कोरे, दिनकर पाटील, किर्ती भुतडा यांच्या प्रतिष्ठानांनाही यावेळी भेटी दिल्या. यावेळी पुरुषोत्तम बजाज, विनोद भुतडा, संजय केंद्रे, आनंद अंकलकोटे यांचीही उपस्थिती होती.

# अवैधरीत्या गुटखा पान मसाला वाहतूक करणाऱ्यांवर स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

धाराशिव (प्रतिनिधी)- पोलीस अधीक्षक श्रीमती रितू खोखर यांनी पोलीस निरीक्षक विनोद इज्जपवार, स्थानिक गुन्हे शाखा, धाराशिव यांना जिल्ह्यातील गुटखा विक्री करणाऱ्यांवर कडक कारवाई करण्याबाबत आदेशित केले होते. पोलीस निरीक्षक इज्जपवार यांच्या आदेशान्वये स्थानिक गुन्हे शाखेचे स. पो. नि. कासार व पथक हे गस्त करीत असताना त्यांना धुळे-सोलापूर महामार्गावर एक टाटा टेम्पो वाहन महाराष्ट्रात प्रतिबंधित असलेला पान मसाला घेऊन धाराशिवच्या दिशेने जात आहे, अशी गोपनीय माहिती प्राप्त झाली.

नमूद पथकाने तात्काळ महामार्गावर गस्त केली असता नमूद वर्णनाचे वाहन त्यांना तेरणा इंजिनिअरिंग कॉलेज, धाराशिव या ठिकाणी दिसून आले. परंतु सदर वाहन चालकास संशय आल्याने त्याने वाहन वेगाने चालवण्यास सुरुवात केली. सदर वाहन चालकास आनंदनगर पोलीस ठाण्याच्या पथकाच्या मदतीने डी मार्ट धाराशिव च्या समोर सिताफिने थांबवून चालकास त्याचे नाव व पत्ता विचारला असता त्याने त्याचे नाव दीपक दिगंबर पुरी, रा. शिरपूर, तालुका मंठा, जिल्हा जालना असे असल्याचे सांगितले व नमूद वाहनात सागर २००० हा प्रतिबंधित पान मसाला असल्याचे सांगितले. पोलिसांनी पंचनामा करून १८,९५,८८० रु चा सागर २००० पान मसाला व टाटा टेम्पो वाहन असा एकूण ३३,९५,८८० रुपये चा मुद्देमाल जप्त केला असून नमूद वाहन चालकाविरुद्ध पोस्टे आनंदनगर गुरनं ०४/२०२६ कलम १२३, २२३, २७४, २७५ भा. न्याय संहिता अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील कारवाई कामी सदरचा मुद्देमाल व आरोपी आनंद नगर पोलिस ठाण्याच्या ताब्यात देण्यात आला आहे.

सदरची कामगिरी पोलीस अधीक्षक श्रीमती रितु खोखर, अपर पोलीस अधीक्षक श्रीमती शफकत आमना यांचे मार्गदर्शनाखाली पोनि विनोद इज्जपवार, सपोनि सुदर्शन कासार, स्थानिक गुन्हे शाखेचे,पोलीस हवालदार शौकत पठाण, जावेद काझी, प्रकाश औताडे, फरहान पठाण, चालक रत्नदीप डोंगरे आणि आनंद नगर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक खांडेकर, सपोनी परमेश्वर सोगे व पथक यांनी केली आहे.

# काळाबरोबर चेहरे बदलले, पण शाळा अन् मैत्री तशीच! २५ वर्षांनी एकत्र आले गुरुदेव दत्त हायस्कूलचे विद्यार्थी

भूम (प्रतिनिधी)-शहरातील गुरुदेव दत्त हायस्कूलमधील इयत्ता दहावीच्या २००१-०२ च्या माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा रामहरी मंगल कार्यालय येथे अत्यंत उत्साहात पार पडला. तब्बल २५ वर्षांनंतर एकत्र आलेल्या या माजी विद्यार्थ्यांनी शालेय जीवनातील आठवणींना उजाळा देत भावनिक क्षण अनुभवले. या स्नेहसंमेलन कार्यक्रमास सतीश देशमुख, किरण जाधव, विठ्ठल कोळी, अनिल मोटे, संदीप बागडे, महावीर भोपलकर, ए. के. गायकवाड, कमलाकर साबळे, चंद्रकांत तांबे, अंकुश उगलमुगले यांची प्रमुख उपस्थिती होती. अध्यक्षस्थानी कल्याणराव मोटे हे होते. कार्यक्रमाची सुरुवात आलमप्रभू देवस्थान येथे आरती करून करण्यात आली. त्यानंतर माजी विद्यार्थ्यांनी गुरुदेव दत्त हायस्कूलला भेट देत शालेय आठवणींना पुन्हा एकदा उजाळा दिला. शाळेत जसे वर्गाची सुरुवात राष्ट्रगीताने होते, त्याच पद्धतीने या स्नेहमेळाव्याची सुरुवात करण्यात आली.

शिक्षक व विद्यार्थ्यांनी या वेळी मनोगत व्यक्त करत जुन्या आठवणींना उजाळा दिला. तसेच कोरोना काळात निधन झालेल्या विद्यार्थ्यांच्या पालकांना आर्थिक मदत देऊन सामाजिक बांधिलकी जपण्यात आली. विचारांची देवाण-घेवाण, गप्पा आणि आठवणींमुळे हा कार्यक्रम अत्यंत भावनिक व उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. या प्रसंगी अमोल गुंजाळ, सचिन पौळ, धनंजय शेटे, अमोल माळी, मयूर शाळू, संतोष वीर, प्रेम महाजन, सुजित वेदपाठक, अमित होळकर, भरत गाढवे यांच्यासह मोठ्या संख्येने माजी विद्यार्थी-विद्यार्थ निी उपस्थित होते.

शिक्षकांबरोबर उल्लेखनीय कार्य करणाऱ्या माजी विद्यार्थ्यांचा सन्मान उल्लेखनीय कार्य करणाऱ्या माजी विद्यार्थ्यांच्या वतीने सर्व शिक्षक, शिक्षिका व सेवकांचा सत्कार करण्यात आला. काही माजी विद्यार्थ्यांचाही विशेष सत्कार करण्यात आला. या वेळी दिवंगत शिक्षक, विद्यार्थी यांना श्रद्धांजली अर्पण केली.

# जिल्हा पोलीस अधिक्षक कार्यालय येथे सुरक्षादुत चॅटबॉट सुरु

धाराशिव (प्रतिनिधी)- पोलीस अधीक्षक श्रीमती रितु खोखर यांच्या संकल्पनेतून धाराशिव पोलीस दला तर्फे नागरिकांना सुरक्षित, त्वरीत व पारदर्शक सेवा मिळावी या हेतुने सुरक्षादुत नावाचे व्हॉटसअप चॅटबॉट कार्यन्वित करण्यात आले असुन एकुण ८ सेवा त्यामध्ये गुन्हा नोंदवा (सिटीजन पोर्टल), वाहतुक सेवा, महिला व बाल सुरक्षा, सायबर गुन्हे व जनजागृती, भाडेकरुची माहिती कळवा, आपले सरकार सेवा,अभिप्राय व आपत्कालीन संपर्क या सेवा उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत. नागरिकांनी ७७९६४२२५२५ या व्हॉटसअप क्रंमाकावर व्हॉटसअप द्वारे ꣸ असा मॅसेज( चर्शीरसश) केल्यास त्यांना वरील सेवांची यादी दिसुन येईल. त्यापैकी नागरिक त्यांना आवश्यक त्या सेवेचा लाभ घेवू शकतात. सदर चॅटबॉट धाराशिव जिल्हा पोलीस दलाचे संकेत स्थळाशी सलग्न करण्यात आले असुन ते आल दि.०८.०१.२०२६ पासून सुरु करण्यात आले आहे.

# चोरीच्या मोटारसायकलसह आरोपी अटक

धाराशिव (प्रतिनिधी)- पोलीस अधीक्षक श्रीमती रितु खोखर यांच्या आदेशावरुन स्थानिक गुन्हे शाखेतील पथक हे दि. ०६.०१.२०२६ रोजी धाराशिव जिल्ह्यात मालाविषयक गुन्हे उघडकीस आणणे कामी गस्तीस होते. दरम्यान पथकास माहिती मिळाली की, एक इसम बसस्थानकातील प्रदीप हॉटेल जवळील गेट मध्ये काळ्या रंगाची मोटरसायकल घेवून थांबला असुन ती चोरीची मोटरसायकल आहे. अशी खात्रीलायक बातमी मिळालेवरुन पथकाने लागलीच तेथे जाउन सूर्यकांत उर्फ सुरज उर्फ रावसाहेब मस्के वय३५ वर्ष रा मारवडगली धाराशिव ता. जि. धाराशिव यास ताब्यात घेतले. गुन्ह्याच्या अनुशंगाने त्याच्याकडे तपास केला असता त्याने चोरी केल्याची कबुली दिली. पथकाने त्याच्या ताब्यातून नमूद गुन्ह्यातील चोरीची मोटरसायकल. एकुण४०,००० किंमतीची मोटरसायकल हस्तगत केली आहे. नमुद आरोपीस पुढील कार्यवाही कामी धाराशिव पोलीस ठाणे येथे हजर केले आहे.

सदरची कामगीरी मा. पोलीस अधीक्षक श्रीमती रितु खोखर, अपर पोलीस अधीक्षक श्रीमती शफकत आमना यांच्या आदेशावरुन स्था.गु.शा.चे पोनि श्री. विनोद इज्जपवार यांचे आदेशावरुन पोलीस हावलदार बळीराम शिंदे, राहुल नाईकवाडी, चव्हाण, अशोक ढगारे, चालक पोअं दहीहंडे यांच्या पथकाने केली आहे.

# प्राचार्य डॉ.संदीप देशमुख यांचा सत्कार

धाराशिव (शीला उंबरे-पेंढरकर)- येथील रामकृष्ण परमहंस महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संदीप देशमुख यांचा संशोधक विद्यार्थी यांच्याकडून सत्कार करण्यात आला.

रामकृष्ण परमहंस महाविद्यालयात पदवी आणि पदव्युत्तर या अभ्यासक्रमाबरोबरच अनेक विषयांची संशोधन केंद्र आहेत. हिंदी विभागातील संशोधन केंद्राचे विद्यार्थी डॉ. बनसिंग भोई यांनी विशेष सहकार्याबद्दल प्राचार्य डॉ. संदीप देशमुख यांचा सत्कार करण्यात आला. डॉ. बनसिंग भोई हे हिंदी विभागप्रमुख प्रो.डॉ. केशव क्षीरसागर यांच्या मार्गदर्शनाखाली पोस्ट पीएच.डी. करत आहेत.

याप्रसंगी अर्थशास्त्र विभाग प्रमुख प्रा. डॉ. मारुती अभिमान लोंढे, समाजशास्त्र विभाग प्रमुख प्रा.माधव उगिले , प्रा.शरद लोंढे, श्री दादा माळी उपस्थित होते.

**Name of change Declaration**
Here in this advertise i am declaring that i have change My Name which was : **KOTWAL SOHEL AHEMED ALI.**
TO: **SOHEL AHEMEDALI KOTWAL.**
Hence for this Declaration i will be known by this name and will use . in future the **SOHEL AHEMEDALI KOTWAL** will used by my family husband /wife, children and relative.
OLD NAME :- **KOTWAL SOHEL AHEMED ALI.**
NEW NAME:- **SOHEL AHEMEDALI KOTWAL.**
Address :- SHIRIN COLONY, OSMANABAD.413501.
Adhar no.-263886951008.
Mob. No.-8806525217

टोनर रिफिलिंग

फक्त ₹ ३००/-
गॅरंटेड
प्रिंटिंग क्वालिटी
संपर्क
8600025070
9028376965
प्रिंटर्स पॅराडाईस
प्रिंटर रिपेअरिंग
कॉम्पॅटिबल कार्ट्रिजेस
टोनर रिफिलिंग

निलंगा शहरातील
एलआयसी
विमा भरण्याचे केंद्र
सितारी विमा सेवा केंद्र
दु.नं.२३, इदगाह कॉम्प्लेक्स,
जनता दवाखान्यासमोर
शिवाजी चौक, निलंगा.
वेळ सकाळी ९ ते सायं. ९ पर्यंत
जमीरोद्दीन सितारी
चेअरमन क्लक मेंबर CLIA
एजंट भरती चालू आहे.
संपर्क Off: (02384) 242224,
9422612239,
9422658396

**Name of change Declaration**
Here in this advertise i am declaring that i have change My Name which was : SHAIKH GOUS MOHAMMED HAJI SAIFANSAB
TO: GOUS AHAMAD SAIFAN SHAIKH
Hence for this Declaration i will be known by this name and will use SHAIKH GOUS MOHAMMED HAJI SAIFANSAB future the same will used by my family husband /wife, children and ED relative.
OLD NAME :- SHAIKH GOUS MOHAMMED HAJI SAIFANSAB
NEW NAME :- GOUS AHAMAD SAIFAN SHAIKH
Address - 128 Masjid Javal At Post Boramani Taluka Solapur South DIST.Solapur. -413002
Adhar n.-327421918355 Mob.8208324441

**Name of change Declaration**
Here in this advertise i am declaring that i have change My Name which was : SHAIKH ASHA BI GOUS MOHAMMED
TO: MEHAJABIN GOUSAHAMAD SHAIKH
Hence for this Declaration i will be known by this name and will use SHAIKH ASHA BI GOUS MOHAMMED in future the same will used by my family husband /wife, children and ED relative.
OLD NAME :- SHAIKH ASHA BI GOUS MOHAMMED
NEW NAME :- MEHAJABIN GOUSAHAMAD SHAIKH
Address - At Post Boramani Taluka Solapur South DIST.Solapur. -413002
Adhar n.-968381584635
Mob.8208324441

हे पत्र मुद्रक,प्रकाशक, संपादक व मालक दयानंद शंकरराव जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर (महाराष्ट्र) येथे छापून समर्थनगर धाराशिव (उस्मानाबाद) येथे प्रकाशित केले. मो.नं.९४२२४७२५०२
Latur Samachar, Osmanabad Printed & Published by Jade Dayanand Shankarrao , Printed at Jade Offset Printers,Mitra Nagar Latur. and Published at Samarthnagar,DHARASHIV(Osmanabad) Editor : Jade Dayanand Shankarrao Mob:9422472502 RNI- MAHMAR/2003/11649